। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक १० वा । बुधवार दिनांक ११ मार्च, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

# जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय पुतळा उभारता येणार नाही

## राष्ट्रपुरुषांच्या पुतळ्यांसाठी मार्गदर्शक तत्वे




धाराशिव ' (जिमाका) राज्यात राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींचे पुतळे उभारण्याबाबत स्पष्ट व सुसूत्र प्रक्रिया निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने २ मे २०१७ रोजी शासन निर्णय जारी केला आहे.या निर्णयानुसार राज्यातील गाव,शहर किंवा सार्वजनिक ठिकाणी राष्ट्रपुरुष अथवा थोर व्यक्तींचे पुतळे उभारण्यासंदर्भात मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली असून अशा पुतळ्यांना परवानगी देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत.

शासनाकडे राष्ट्रपुरुषांच्या पुतळ्यांबाबत अनेक प्रस्ताव येत असतात.मात्र या प्रस्तावांसोबत जोडलेली मान्यता पत्रे,ठराव आणि ना-हरकत प्रमाणपत्रे अनेकदा जुन्या तारखेची असल्याने निर्णय घेण्यात अडचणी निर्माण होत होत्या. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने १८ जानेवारी २०१३ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशांचाही विचार करणे आवश्यक असते.त्यामुळे अनेक प्रस्ताव दीर्घकाळ प्रलंबित राहत होते. हा विलंब टाळण्यासाठी आणि प्रक्रिया सुलभ करण्यासाठी शासनाने मान्यता देण्याचे अधिकार स्थानिक प्रशासनाला देण्याचा निर्णय घेतला आहे. याआधीचा २ फेब्रुवारी २००५ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करून नवीन मार्गदर्शक तत्वे लागू करण्यात आली आहेत.

या निर्णयानुसार राष्ट्रपुरुष किंवा थोर व्यक्तींचे पुतळे उभारण्यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही.पुतळे हे स्थानिक लोकांच्या पुढाकारातून व लोकवर्गणीतून उभारावेत,अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. तसेच पुतळा उभारण्याची मागणी करणारी संस्था नोंदणीकृत असणे बंधनकारक करण्यात आले आहे.

पुतळा उभारण्यासंदर्भातील प्रस्तावांची छाननी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली कायमस्वरूपी पुतळा समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.या समितीत जिल्हाधिकारी अध्यक्ष असतील तर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा नगरपालिका/नगरपरिषदेचे मुख्याधिकारी,जिल्हा पोलीस अधीक्षक,सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता आणि निवासी उपजिल्हाधिकारी सदस्य म्हणून काम पाहतील.

पुतळा उभारण्यासाठी कोणतीही व्यक्ती किंवा संस्था जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय शासकीय,निमशासकीय किंवा खाजगी जागेवर पुतळा उभारू शकणार नाही.पुतळा उभारण्याची जागा वादमुक्त असणे आवश्यक असून ती अनधिकृत किंवा अतिक्रमित नसावी. जागेच्या मालकी हक्काबाबत आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.तसेच पुतळा उभारलेल्या जागेचा वापर इतर कोणत्याही प्रयोजनासाठी करता येणार नाही.

पुतळ्याच्या चबुतऱ्याचे मोजमाप, आराखडा,साईट प्लॅन,पुतळ्याची उंची,वजन,रंग आणि तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या धातू किंवा साहित्याचा तपशील मुख्य वास्तुशास्त्रज्ञ,महाराष्ट्र राज्य यांना सादर करून त्यांची मान्यता घेणे आवश्यक राहील.तसेच पुतळ्याच्या क्ले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता घेऊन ब्रॉँझ,फायबर किंवा इतर धातूपासून पुतळा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पुतळा उभारल्यामुळे गाव किंवा शहराच्या सौंदर्यात बाधा येणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक असून भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही,स्थानिक वाद किंवा जातीय तणाव वाढणार नाही याची खात्री करून संबंधित पोलीस अधिकाऱ्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. तसेच स्थानिक अल्पसंख्यांक व नागरिकांचा विरोध नसल्याचा स्पष्ट उल्लेखही त्या प्रमाणपत्रात असणे गरजेचे आहे.

शासकीय,निमशासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या परिसरात पुतळा उभारण्यासाठी संबंधित मंत्रालयीन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील.स्थानिक स्वराज्य संस्थेने पुतळा उभारण्याबाबत ठराव करून तो प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच पुतळा उभारल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याबाबत पोलीस विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.

भविष्यात रस्ते रुंदीकरण किंवा इतर विकासकामांमुळे पुतळा हलविण्याची आवश्यकता निर्माण झाल्यास त्यास विरोध न करता स्वखर्चाने हलविण्याबाबत संबंधित संस्थेकडून शपथपत्र घेण्यात येणार आहे.तसेच पुतळ्याची देखभाल, मांगल्य आणि पावित्र्य राखण्याची जबाबदारी संबंधित संस्थेने स्वीकारणे आवश्यक राहील. पुतळ्याचा सर्व खर्च संस्था उचलेल आणि शासनाकडे निधीची मागणी करणार नाही,असे वचनपत्रही प्रस्तावासोबत देणे आवश्यक आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने प्रस्तावाची सर्व बाजूंनी छाननी करून कारणमीमांसेसह स्पष्ट शिफारस करावी.त्यानंतर जिल्हाधिकारी पुतळा उभारण्यास मान्यता देऊ शकतील. तसेच सर्वोच्च न्यायालयाने १८ जानेवारी २०१३ रोजी दिलेल्या आदेशांचे पालन होत असल्याची खात्री करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

मान्यता देताना आदेशामध्ये पुतळ्याचे अचूक स्थान,जागेची मालकी,सर्वे क्रमांक,रस्त्यापासूनचे अंतर,तसेच देखभाल आणि दुरुस्तीची जबाबदारी कोणाकडे आहे याचा संपूर्ण तपशील नमूद करणे आवश्यक राहील. प्रस्तावासोबत जोडलेली ठरावे आणि ना-हरकत प्रमाणपत्रे एक वर्षापेक्षा जुनी नसावीत,अशीही अट घालण्यात आली आहे.तसेच एकाच राष्ट्रपुरुषाचा पुतळा त्या गावात किंवा शहरात दोन किलोमीटरच्या परिसरात आधीपासून नसल्याची खात्री करूनच नवीन पुतळ्यास परवानगी देण्यात येईल.

वरील मार्गदर्शक तत्वे सूचनात्मक असून स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन अतिरिक्त निकष निश्चित करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीला देण्यात आले आहेत.सर्व अटींची पूर्तता झाल्यासच पुतळा उभारण्यास परवानगी देण्यात येईल,अन्यथा प्रस्ताव नाकारण्याचे अधिकारही जिल्हाधिकाऱ्यांकडे राहतील.

# क्राईम न्युज

## प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, मुबीन अजीज कुरेशी, अब्दुल अलीम अब्दुल रशीद कुरेशी, दोघे रा. कुरेशी गल्ली नळदुर्ग, अहमद इनामदार, रा. काझी गल्ली नळदुर्ग यांनी दि. ०८.०३.२०२६ रोजी कुरेशी गल्ली नळदुर्ग जवळ कुरेशी समाजाचा मोकळ्या जागेतील झाडा झुडपामध्ये गोवंशीय जातीचे ७ जनावरे एकुण ७२,००० किंमतीचे गोवंशीय जातीचे जनावरे त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या बाभळीच्या झाडाला बांधलेले असताना नळदुर्ग पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१)(एच), ११(१)(आय) सह ५, ९ पशु संरक्षण अधिनियम अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## पेट्रोलचे पैसे न देता दाखविली एअर गण

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि. ०७.०३.२०२६ रोजी वाशी फाटा ते सरमकुंडी दरम्यान प्रताप पेट्रोलपंप येथे दिनेश भगवान चव्हाण, रा. कोपरा ता. अंबेजोगाई जि. बीड ह.मु. पारगाव ता. वाशी जि. धाराशिव यांनी ९,१५ लिटर पेट्रोल भरुन त्याचे ९६४ रु भरुन पैसे न देता पिस्टल सारख्या दिसणारे एअर गणचा धाक दाखवून निघून गेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- फिर्यादी नामे-तानाजी हिष्णु भोरे, वय २४ वर्षे, रा. दहीफळ ता.वाशी जि. धाराशिव यांनी दि.०८.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भ ) गुन्हा नोंदवला आहे.

## प्राण्यांची निर्दयपणे कत्तल करुन मांस विक्री करणाऱ्यावर गुन्हा

धाराशिव (प्रतिनिधी)- आंबी पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, सलीम गफार कुरेशी, रा. कुह्राड गल्ली परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि. ०८.०३.२०२६ रोजी शेळगाव ते पांढरेवाडी रोडवर रेवण दत्तोबा गांगुर्डे यांचे शेताजवळ गोवंशीय जातीचे १२ किलो मांस एकुण २७,५०० किंमतीचे गोवंशीय निर्दयतेने कत्तल करुन मांस बेकायदेशीर रित्या वाहतुक करुन जवळ बाळगलेला. असताना आंबी पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द कलम ५(क), ९(अ) पशु संरक्षण अधिनियम अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.०८ मार्च रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण १२८ कारवाया करुन १,०८,७५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## पत्रकारांच्या आरोग्यासाठी जिल्हा परिषद धाराशिवचा पुढाकार

# आरोग्य तपासणी शिबिरात ७१ जणांची तपासणी



धाराशिव (जिमाका)- जिल्हा परिषद धाराशिव व आरोग्य विभागाच्या वतीने जिल्ह्यातील सर्व प्रसार माध्यमातील प्रतिनिधींसाठी आरोग्य तपासणी शिबिर व विविध शासकीय योजनांची माहिती देणारी कार्यशाळा आज ९ मार्च रोजी आयोजित करण्यात आली. कै.यशवंतराव चव्हाण सभागृह,जिल्हा परिषद धाराशिव येथे पार पडलेल्या या शिबिराला जिल्ह्यातील माध्यमांच्या प्रतिनिधींसह अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या आरोग्य तपासणी शिबिरामध्ये पत्रकारांसह अधिकारी-कर्मचारी अशा एकूण ७१ जणांची तपासणी करण्यात आली.शिबिरात बाह्यरुग्ण तपासणीअंतर्गत २६ पत्रकार व ४५ अधिकारी-कर्मचारी यांनी आरोग्य तपासणी करून घेतली. तसेच प्रयोगशाळा तपासणी ५० जणांची करण्यात आली.मधुमेह व उच्च रक्तदाब तपासणी ७१ जणांची करण्यात आली असून ईसीजी तपासणी ४६ जणांची करण्यात आली.याशिवाय आयुष्मान कार्ड व आभा कार्ड नोंदणीचे कामही करण्यात आले.

आरोग्य तपासणीबरोबरच जिल्हा परिषद अंतर्गत विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजना व उपक्रमांची माहिती पत्रकारांना देण्यात आली. दुपारच्या सत्रात विविध योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.यामुळे पत्रकारांना शासनाच्या योजनांची अचूक माहिती मिळून ती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यास मदत होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या आरोग्य शिबिरास जिल्हा परिषद धाराशिवचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश काळे,प्रकल्प संचालक अनुप शिंगुलवार,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) अनंत कुंभार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) देवदत्त गिरी,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास, शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक), जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक,इतर विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पत्रकारांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे पत्रकारांनी स्वागत केले असून अशा उपक्रमांमुळे पत्रकारांना आरोग्याविषयी जागरूकता मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छ. शिवाजी महाराज चौक दरम्यानची झाडे न तोडण्याची मागणी




धाराशिव (प्रतिनिधी) - शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक दरम्यान नगर परिषद शॉपिंग सेंटर समोरील असलेली झाडे तोडण्यात येऊ नयेत, अशी मागणी नगरसेवक नाना घाटगे, अमित उंबरे व न प शॉपिंग सेंटरधारकांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. दरम्यान, याप्रकरणी कारवाई करण्यास टाळाटाळ केल्यास आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

धाराशिव शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक या भागातील रस्त्याचे काम सुरू होणार असल्याचे समजते. त्यासाठी रस्ता मजबुतीकरण व नालीचे काम करीत असताना नगर परिषदेच्या श्री तुळजाभवानी शॉपिंग सेंटर समोरील गाळेधारकांनी गेल्या ४० वर्षांपासून जोपासलेली १२ झाडे तोडणार असल्याचे समजते. संबंधित ठेकेदारास झाडे न तोडता नाली करून किंवा रस्ता खोदून आवश्यक तेवढे रस्त्याचे काम करावे. तसेच सध्याच्या रस्त्याच्या उंचीपेक्षा नवीन होणारा रस्ता जास्त उंचीचा करण्यात येऊ नये. त्यामुळे भविष्यात दुकानदारांच्या दुकानात पावसाळ्यात पावसाचे पाणी जाणार नाही. तर पर्यावरणाची हानी करून झाडे तोडू नयेत यासाठी सर्व दुकानदारांनी कडाडून विरोध केला आहे. जर झाडे तोडण्यास परवानगी दिली तर नाईलाजास्तव गाळेधारकांच्या मागणीचा विचार करून व पर्यावरण वाचविण्यासाठी त्याच जागेवर आमरण उपोषण करावे लागणार असल्याचा इशारा नगरसेवक नाना घाटगे यांच्यासह इतरांनी दिला आहे. या निवेदनावर

नगरसेवक नाना उर्फ संतोष घाटगे, शिवसेना (ठाकरे) चे नेते अमित उंबरे, नितीन शेरखाने, श्यामसुंदर भन्साळी, अनिल शिंदे, बजरंग काळे, संजय तुपे, दिलीप लोकरे, रवींद्र गुळवे, राजेंद्र मोरे, जालिंदर पाटील, संजय पवार, सागर चांडक, अशोक सपकाळ, पवन सुरवसे, महेश चौधरी, आदित्य वडगावकर, सागर करंडे, संतोष माने, पुरुषोत्तम घोगरे, बाळासाहेब घोगरे आदींसह इतरांच्या सह्या आहेत.

# परंड्यात १३ मार्चला 'पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा : २१० पदांसाठी उमेदवारांची निवड होणार

धाराशिव (जिमाका ) शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगार धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सुशिक्षित बेरोजगार व नोकरी इच्छुक उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत 'पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा' आयोजित करण्यात येत आहे.

याच अनुषंगाने शुक्रवार,१३ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,मॉडेल करिअर सेंटर धाराशिव आणि शिक्षणमहर्षी गुरुदेव आर.जी.शिंदे महाविद्यालय अंतर्गत आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र,परंडा यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षणमहर्षी गुरुवर्य आर.जी.शिंदे महाविद्यालय, परंडा येथे नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी 'पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा' आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्यात खाजगी क्षेत्रातील छत्रपती संभाजीनगर,धाराशिव,बार्शी व परंडा येथील विविध आस्थापना सहभागी होणार असून त्या सुमारे २१० पदांसाठी उमेदवारांची निवड करणार आहेत.तसेच मेळाव्यात उपस्थित उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या विविध संधींबाबत मार्गदर्शनही करण्यात येणार आहे.

तरी या पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा व स्वयंरोजगार मार्गदर्शन मेळाव्यात जास्तीत जास्त इच्छुक उमेदवारांनी सहभागी व्हावे,असे आवाहन सहायक आयुक्त,जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,धाराशिव यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२९९४३४ वर संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# अवैध मद्य विरोधी कारवाई

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत सुनिता रा. पारधीपढि तेर ता. जि. धाराशिव या दि.०८.०३.२०२६ रोजी तेर पारधीपिढी मध्ये रोडलगत असलेल्या पत्र्याचे शेड जवळ अंदाजे ८,६०० किंमतीची ७० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द ढोकी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

तसेच तुळजापूर पोलीस ठाणे अंतर्गत गुणवंत रा. सिंदफळ ता. तुळजापूर जि. धाराशिव या दि.०८.०३.२०२६ रोजी जुनी प्रताप टाकीजवळ रोडवर वासुदेव गल्ली तुळजापूर येथे अंदाजे १,००० किंमतीची १० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## ट्रम्पला समजावणार कोण?

अमेरिकेचे सर्वेसर्वा ट्रम्प हे जगावर आपली सत्ता राहावी. आपलेच चालावे या उद्देशाने त्यांची ही वागणुकीस रोखणार कोण? यापुर्वी असे अमेरिकेकडून कधीही घडले नव्हते, मात्र ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा सत्ता हाती येताच जगावर वर्चस्व मिळविण्याचा जो प्रयत्न सुरु केला आहे तोच जगाने एक होवून रोखला पाहिजे. ट्रम्प यांचे लक्ष्य हे लहान-लहान देश आहे. त्यांना आपल्याशी करणे, त्यांना कर्ज देणे, दबाब निर्माण करणे असे विविध प्रकार करीताना दिसून येत आहे. पाकिस्तानला मदत केली. पाकिस्तानमध्ये घुसून ओसामा बिन लादेन याला ठार मारले व समुद्राच्या तळाशी दफण केले. जो विरोधात जाईल त्याचा खात्मा अटल आहे. मुळात जगात ईस्लामिक राष्ट्र अनेक आहेत. लहान भुभाग असलेले आहेत. ते सर्व संपन्न असे आहेत. असे संपन्न राष्ट्राने आमचेच एकले पाहिजे, हा त्याचा अट्टहास दिसून येत आहे. त्यामुळे ट्रम्प यांना समजावणे आवघड आहे. लहान-लहान देश यांनी स्वतंत्रबाणा निर्माण करण्यापेक्षा लाचार होत आहेत. आज पर्यंतचा इतिहास पाहिला असता 'मोठा मासा लहान माशाला खात असतो' तसे अमेरिकेचे धोरण दिसून येते. तसे पाहिले तर अमेरिका-इस्त्रायल आणि इराण युद्धाचा भडका उडत आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी इराणवर मोठ्या हल्ल्याची धमकी दिली आहे. ते म्हणाले की, जर इराणने होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये तेलाचा पुरवठा थांबवण्याचा प्रयत्न केला, तर अमेरिका त्याच्यावर २० पट अधिक ताकदीने हल्ला करेल. शत्रू पूर्णपणे नष्ट होईपर्यंत हे युद्ध सुरू राहील. ट्रम्प यांनी हे देखील सांगितले की, युद्ध सुरू झाल्यापासून अमेरिका आणि इस्त्रायलने मिळून इराणमधील आतापर्यंत ५,००० हून अधिक ठिकाणांवर हल्ला केला आहे. काही अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणांना अजून जाणूनबुजून लक्ष्य करण्यात आलेले नाही, जेणेकरून गरज पडल्यास नंतर कारवाई करणार हे निश्चित दिसत आहे. फ्लोरिडाच्या डोरल शहरात अमेरिका आणि इस्त्रायलने या युद्धात बरीच मोठी आघाडी घेतली आहे आणि कदाचित हे युद्ध लवकरच संपेल, परंतु सध्या लष्करी कारवाई सुरूच राहील. असे दिसून येते. इराणमध्ये सुरू असलेल्या युद्धादरम्यान, ट्रम्प यांनी ऑस्ट्रेलियाला आवाहन केले आहे की, त्यांनी इराणच्या महिला फुटबॉल खेळाडूंना आश्रय द्यावा. ट्रम्प म्हणाले की, जर त्यांना इराणमध्ये परत पाठवले गेले, तर त्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो आणि ही एक मोठी मानवी चूक ठरेल. ही घटना ऑस्ट्रेलियामध्ये सुरू असलेल्या महिला आशियाई कप दरम्यान समोर आली. खरं तर, २८ फेब्रुवारी रोजी इराणवर झालेल्या हल्ल्यानंतर महिला संघाने राष्ट्रगीत गायले नव्हते, ज्याला सरकारविरोधी निषेध म्हणून पाहिले गेले. यानंतर, इराणी माध्यमांमध्ये खेळाडूंना 'देशद्रोही' म्हटले गेले आणि त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर पोस्ट करून सांगितले की, जर या खेळाडूंना इराणमध्ये पाठवले गेले तर त्यांना गंभीर शिक्षेला सामोरे जावे लागेल किंवा त्यांचा जीवही जाऊ शकतो. ट्रम्प यांची धमकी भयाण आहे. यावर जगाने विचार केला पाहिज की, अमेरिकेचे धोरण हे योग्य नाही. ईराण यांच्याकडे तेल साठे आहेत. इंधनाबाबत संपन्न देश आहे. ईराण जगाला तेल पुरवू शकतो. आर्थिकदृष्टया संपन्न देश आहे. यामुळे अमेरिकेचा डोळा आहे. त्यापेक्षाही इस्लामिक राष्ट्रामध्ये फुट पाडण्याचे सतत काम होते. आज पर्यंत अमेरिका हा छोट्या राष्ट्रावर आक्रमण केले. युद्ध हे दुसऱ्याच्या भुमित केले. अमेरिका आज पर्यंत स्वतंत्र लढली नाही. ईस्त्राईलच्या खांद्यावर बंदूक ठेवून ईराणला साफ करण्याचा प्रयत्न आहे. ईस्लामिक राष्ट्रात फुट पाडणे व आपला स्वार्थ साधणे हा हेतू ईस्लामिक राष्ट्राने ओळखला पाहिजे. आज पर्यंतचा इतिहास पाहिला तर अनेक बाबी कळून येतील. लहान राष्ट्राला टार्गेट करणे, युद्धासाठी इतर देशाचा भूभाग वापरणे, मोठ्या प्रमाणात कर्ज देणे असे अनेक बाबी धुर्तपने केल्याचे दिसून येते. इराण हा चिवट देश आहे. महासत्ताधिश अमेरिकेला शरण आला नाही. आकरा दिवसाच्यावर युद्धाला तोंड देत आहे. त्यामुळे इराण झुंज देत आहे त्याला इस्लामिक राष्ट्राने मदत केली पाहिजे. उलट मुग गिळून गप्प दिसून येत आहेत. जगातील शांतात निर्माण करणारे नेते. राष्ट्र व संघटन गप्प दिसून येत आहेत. युद्ध रोखण्याचे धाडस करीत नाहीत. युद्ध कसे थांबेल या बाबत बोलत नाहीत. मध्यस्थ शोधला जात नाही. उलट भारताने याबाबत लक्ष घालावे असे मत स्वार्थी राजकारणी व्यक्त करीत आहेत. भारताने मध्यस्थ का करावी? भारतावर शेजारी राष्ट्राने आक्रमण केलीत त्यावेळी इतर राष्ट्र गप्प होते. असो, आता खरा लहान व गरीब अन्याय ईस्लामिक राष्ट्रावर होत आला आहे. त्यांनाच कर्जदेवून कर्जबाजारी बनविले गेले आहे. इराण न घाबतरता युद्धाला तोंड देत आहे. ईस्त्राईला मदत अमेरिका करते तसे इराणाला कोणीही मदतीचा हात पुढे केला नाही. मोठ्या हिंमतीने इराण लढत आहे. तोडीस तोड उत्तर देत आहे. आकरा दिवसापासून युद्ध चालू आहे ते कोणत्याही परिस्थितीत थांबले पाहिजे. या बाबत प्रयत्न होणे अपेक्षित आहे. युद्ध तसे परवडणारे नाही. जगाला तेलाचा पुरवठा थांबला तर विकास थांबला, महागाई वाढत आहे. सर्वबाबी ह्या ट्रान्सपोटींग होतात, त्यासाठी इंधनाची मोठी गरज आहे. इंधनाचा पुरवठा थांबला तर विकासाचे जगाचे चक्र थांबल्याशिवाय राहाणार नाही. त्यामुळे सर्वांनी विचार करून जग पुढे आले पाहिजे. जगाने अमेरिकेला रोखले पाहिजे. तसे होईल असे वाटत नाही. जगात तसे पाहिले तर ईस्लामिक राष्ट्र अनेक आहेत. ते एक होवून ईराणला मदत केली पाहिजे. तसे होताना दिसून येत नाही. 'मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधावी' असा विचार जग करीत असेल. त्यामुळे बेचिराख जर इराण झाले ते अमेरिकेच्याहाती गेले तर मोठे नुकसान सोसावे लागेल. ईस्लामिक राष्टे श्रीमंत आहेत. त्यांच्याकडे बुद्धी कमी दिसून येते. त्यामुळे आपआपसात भांडणे लावले जात असले तरी गप्प आहे. वास्तविक अमेरिकेला ईराणशी युद्ध करण्याची व इस्त्राईला पुढे करून युद्धाची गरज नव्हती, तरी युद्ध चालू आहे. हे युद्ध थांबण्यासाठी जगातील राष्ट्र एक होवून प्रयत्न केले पहिजेत. कोणत्याही परिस्थितीत युद्ध थांबले पाहिजेत. तसा जगाने प्रयत्न केला तर जगात शांतात राहील नसता अघटीत घडल्याशिवाय राहाणार नाही.

# आज गरज आहे ती परस्परांबद्दल जिव्हाळा, आत्मियता, प्रेम, संघ भावनेची -विश्वधर्मी डॉ. विश्वनाथ कराड



**लातूर/प्रतिनिधी :** जगामध्ये संपूर्ण जीव सृष्टीला विनाशाच्या उंबरठ्यावर नेऊन ठेवेल अशी भयंकर युद्ध स्थिती निर्माण झाली आहे. आज गरज आहे ती परस्परांबद्दल जिव्हाळा, आत्मियता, प्रेम, संघ भावनेची आणि हे केवळ खेळाच्या भावनेतूनच शक्य होऊ शकते. युद्धाच्या जागी खेळ आणि विनाशाच्या जागी विकास हा संदेशच कुस्तीच्या माध्यामातून दिला जाईल. हे मैदान जागतिक शांततेचा एक आखाडा आहे. येथे स्वराज्य आणि स्वराष्ट्राच्या मातीतील कुस्तीचा विजयी नाद घुमणार आहे असे विचार विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी व्यक्त केले.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड स्मृती प्रित्यर्थ लातूर येथील विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रुई) च्या पवित्र यज्ञ भूमीवर विश्वातील एकमेव मानवतातीर्थ भवनाच्या विशाल प्रांगणात अभूतपूर्व राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा-२०२६ च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलते होते.

यावेळी हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच महाराष्ट्र केसरी पै. आप्पासाहेब कदम, बंडातात्या पाटिल, बापूसाहेब मोरे, विष्णू जोशीलकर, रामेश्वर (रुई) चे माजी सरपंच तुळशीराम दा. कराड, काशीराम दा. कराड, आमदार रमेशअप्पा कराड, डॉ. हनुमंत कराड, श्री. राजेश कराड, ऋषिकेश कराड, प्रा. तेजस कराड, श्री. बाळासाहेब बडवे, श्री. सरकार निंबाळकर, डॉ. एस. एन. पठाण, डॉ. रत्नदीप जोशी, डॉ. महेश थोरवे व प्रा. विलास कथुरे उपस्थित होते.

डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, मऊ मेणाहूनि आम्ही विष्णूदास कठीण वज्रास भेदू ऐसे अशी परंपरा असलेल्या या गावात जागतिक स्तरावरील पैलवान येत आहेत ही अभिमानास्पद बाब आहे. खेळ परंपरेचा असून लोकांना जोडणारा, भावी जीवनाला दिशा देणारा आहे. ही स्पर्धा १९ वर्षापासून सुरू आहे.

दिनानाथ सिंग म्हणाले, आधुनिक काळातही लाल मातीवर प्रेम करणारे डॉ. विश्वनाथ कराड हे खऱ्या अर्थाने कुस्ती जगविण्यासाठी सतत प्रयत्न करीत आहेत. डॉ. कराड हे पुनम का चाँद आहे. त्यांनी पैलवानांना जो आधार दिला त्यातून त्यांचे खेळाप्रती प्रेम दिसून येते. ही स्पर्धा सतत अशीच चालत राहावी यासाठी पुढची पिढी तयार आहे.

ह.भ.प. बापूसाहेब मोरे म्हणाले, जीवनातील प्रत्येक गोष्टीतून आनंद घ्यावा हे डॉ. कराड यांच्याकडून शिकले पाहिजे. प्रत्येकाच्या कलागुणांना वाव देण्यासाठी हे व्यासपीठ उभे केले आहे.

बाळासाहेब बडवे म्हणाले, महाराष्ट्राच्या कुस्तीचे हे वैभव अजरामर रहाण्यासाठी डॉ. विश्वनाथ कराड यांनी अद्वितीय कार्य केले आहे.

संपूर्ण महाराष्ट्रातून आलेले २५० पैलवान लाल मातीत उतरणार आहेत. उद्घाटनाची कुस्ती रामेश्वर येथील प्रसाद शिंदे व कोल्हापूर येथील प्रणव राख यांच्यात झाली.

कुस्ती स्पर्धेचे धावते वर्णन समालोचन बाबा निम्हण यांनी केले. प्रा. विलास कथुरे यांनी प्रास्ताविकेत कुस्ती संदर्भातील माहिती दिली व आभार मानले.

## प्रोस्टेट, त्वचा, स्तन आणि कोलन कॅन्सरचा धोका टाळण्यासाठी 'हा' व्हिटॅमिन उत्तम

कर्करोगाविरुद्धच्या लढाईत अलिकडच्या एका अभ्यासात एक मोठी प्रगती झाली आहे, ज्यामध्ये व्हिटॅमिन डी आणि रोगप्रतिकारक शक्ती यांच्यात एक मजबूत संबंध आढळला आहे. जो कर्करोगाशी लढण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. अलिकडेच करण्यात आलेल्या अभ्यासातून असं दिसून आलं आहे की, व्हिटॅमिन डी रोगप्रतिकारक शक्तीचे नियमन करण्यास मदत करते आणि कर्करोगाच्या पेशींच्या वाढीस प्रतिबंध करते.

व्हिटॅमिन डी म्हणजे काय? व्हिटॅमिन डी हे एक पोषक तत्व आहे. जे शरीराला कॅल्शियम आणि फॉस्फरस शोषण्यास मदत करते. तसंच निरोगी आणि मजबूत हाडे आणि दातांसाठी व्हिटॅमिन आवश्यक आहेत. ते स्नायू आणि रोगप्रतिकारक शक्तीच्या कार्यासाठी देखील महत्वाचे आहे. व्हिटॅमिन डी मिळविण्यासाठी सूर्यप्रकाश मुख्य स्रोत आहे. दररोज सकाळी काही मिनिंट सूर्यप्रकाशात राहिल्यास व्हिटॅमिन डी मिळतो. तसंच चरबीयुक्त मासे, कॉड लिव्हर ऑइल आणि अंडी यासारखे पदार्थांमध्ये व्हिटॅमिन डी मुबलक प्रमाणत आढळते. त्याचबरोबर फोर्टिफाइड दूध, संत्र्याचा रस आणि तृणधान्ये यासारखे पदार्थ खाऊन देखील शरीरातील व्हिटॅमिन डी कमतरता भरून काढता येऊ शकते. शाकाहारी लोकांसाठी मशरूम देखील एक चांगला पर्याय आहे. चयापचय आणि हाडे, स्नायू, नसा आणि रोगप्रतिकारक शक्तीच्या आरोग्यासाठी व्हिटॅमिन डी आवश्यक आहे. अभ्यासातून काय सांगतो: उंदरांवरील करण्यात आलेल्या अभ्यासात असं आढळून आलं की, व्हिटॅमिन डी सप्लिमेंटेशनमुळे विशिष्ट आतड्यांतील बॅक्टेरिया वाढतात. ज्यामुळे कर्करोगाशी लढण्याची त्यांची क्षमता सुधारते. या अभ्यासात व्हिटॅमिन डी समृद्ध आहार देण्यात आलेल्या उंदरांमध्ये कर्करोगाविरुद्ध लढण्याची क्षमता सुधारण्यात आली होती आणि इम्युनोथेरपीला चांगला प्रतिसाद मिळाला. हा अभ्यास नुकताच सायन्स जर्नलमध्ये प्रकाशित करण्यात आलाय.

व्हिटॅमिन डी आणि आतड्यांतील सूक्ष्मजीव यांच्यातील संबंध: व्हिटॅमिन डी आतड्यांचे आरोग्य राखण्यास आणि रोगप्रतिकारक प्रतिसाद नियंत्रित करण्यास मदत करते. व्हिटॅमिन डी आतड्यांतील मायक्रोबायोटावर परिणाम करू शकते आणि दाहक-विरोधी प्रभाव पाडू शकते. ते आतड्यांमधील विशिष्ट पेशी सक्रिय करते, ज्यामुळे बॅक्टेरॉइड्स फ्रॅजिलिस सारख्या फायदेशीर जीवाणूंची संख्या वाढते. बॅक्टेरॉइड्स फ्रॅजिलिसची वाढलेली संख्या रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करून कर्करोगाशी लढण्यास मदत करू शकते. प्रोस्टेट, त्वचा, स्तन आणि कोलन कर्करोगासह अनेक प्रकारच्या कर्करोगाच्या उपचार आणि प्रतिबंधात व्हिटॅमिन डी उपयुक्त ठरू शकते.

# उद्योग क्षेत्रात कुशल व प्रशिक्षित अभियंत्यांची गरज - प्रा.डॉ.व्ही.डी.बच्चूवार



**लातूर/प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देत इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील विविध करिअर संधींबाबत मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स व भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक्स व संबंधित क्षेत्रांमध्ये उपलब्ध असलेल्या करिअरच्या संधींबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. व्ही. डी. बच्चूवार यांनी विद्यार्थ्यांना एम्बेडेड सिस्टीम, इंटरनेट ऑफ थिंग्ज (), पीसीबी डिझाईन, रोबोटिक्स, कम्युनिकेशन सिस्टीम, सेन्सर तंत्रज्ञान तसेच सेमीकंडक्टर उद्योग या क्षेत्रांमध्ये वेगाने वाढणाऱ्या रोजगाराच्या संधींबाबत माहिती दिली.सध्या उद्योग क्षेत्रामध्ये कुशल आणि प्रशिक्षित अभियंत्यांची मोठी गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.यावेळी विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान न घेता प्रात्यक्षिक कौशल्ये, प्रोजेक्ट आधारित शिक्षण, संशोधन आणि नवोपक्रम यावर भर देण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाशी जुळवून घेत कौशल्य विकास, इंटर्नशिप आणि उद्योगाशी संबंधित प्रशिक्षण घेणे विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही सांगण्यात आले.या कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून करिअरविषयी मार्गदर्शन घेतले. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील भविष्यातील संधींबाबत स्पष्ट दिशा मिळाल्याचे मत अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार हे होते.यावेळी त्यांनी शिक्षणातील गुणवत्ता वाढविणे, विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण करणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाशी विद्यार्थ्यांना जोडणे याचे महत्त्व अधोरेखित केले.महाविद्यालयातील विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.विद्यार्थ्यांनी नव्या तंत्रज्ञानाचा अभ्यास करून कौशल्य विकासावर भर द्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

सदरील कार्यक्रमाच्या आयोजनासाठी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांचेही प्रोत्साहन मिळाले.या कार्यक्रमाकरिता भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.विजेंद्र चौधरी, डॉ.व्ही. डी.मोटे,डॉ.एस.डी.

लोखंडे, डॉ.एम.बी.पंडगे, डॉ.एस.टी. बिराजदार, प्रा.मेघा अत्राम, डॉ.मंगेश आवाळे, प्रा.रेवती शेळके तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या वतीने करण्यात आले असून, या कार्यक्रमाचे समन्वयक इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख डॉ.टी. एच.मुजावर हे होते.कार्यक्रमाची प्रस्तावना कार्यक्रम समन्वयक डॉ.टी.एच.मुजावर यांनी केली तर कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांचे आभार प्रा. रेवती शेळके यांनी मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## मूत्रपिंड आणि मधुमेहाचे रुग्ण नारळ पाणी पिऊ शकतात काय? जाणून घ्या तज्ञ काय म्हणतात



उन्हाळ्यात डिहायड्रेशन आणि उष्माघात रोखण्यास किंवा त्यावर उपचार करण्यास नारळ पाणी मदत करू शकते. कारण त्यात पोटॅशियम, सोडियम आणि मॅग्नेशियम सारखे इलेक्ट्रोलाइट्स असतात, जे शरीरातील द्रवपदार्थांचे संतुलन राखण्यास मदत करतात. शिवाय, नारळ पाणी शरीरातील उष्णता कमी करण्यास आणि थकवा दूर करण्यास मदत करते. तज्ञ असंही म्हणतात की, नारळ पाणी पिल्याने हँगओव्हर बरा होतो, किडनी स्टोन विरघळतात. तसंच त्यातील मॅग्नेशियमचे प्रमाण मधुमेहींसाठी फायदेशीर आहे.

नारळाच्या पाण्यात काय असते? संशोधनातून असं दिसून आलं आहे की, नारळाच्या पाण्यात इलेक्ट्रोलाइट्स, जीवनसत्त्वे, फायबर आणि खनिजे भरपूर प्रमाणात असतात. तज्ञांचं म्हणणं आहे की, नारळ पाणी अँटीऑक्सिडंट्सने देखील समृद्ध आहे, जे शरीराच्या पेशींचे मुक्त रॅडिकल्सपासून बचाव करते.

खनिजांचा खजिना: नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या मते, नारळ पाण्यात पोटॅशियम, मॅग्नेशियम, कॅल्शियम आणि सोडियम सारखी खनिजे भरपूर प्रमाणात असतात. तज्ञांचं म्हणणं आहे की, ही खनिजे संपूर्ण शरीरासाठी फायदेशीर आहेत. ज्यामध्ये हृदयाचे आरोग्य, हाडं आणि स्नायूंचे कार्य समाविष्ट आहे. नारळ पाण्यात एल-आर्जिनिन नावाचे अमिनो आम्ल आढळते, जे शरीराला प्रथिने बनविण्यास मदत करते. शिवाय, अभ्यासातून असं दिसून आलं आहे की, हे अमिनो आम्ल मुक्त रॅडिकल्स तयार होण्यास प्रतिबंध करते आणि एल-आर्जिनिन रक्तदाब कमी करण्यास मदत करते.

किडनी स्टोन उपचार: कॅल्शियम आणि ऑक्सलेटच्या मिश्रणामुळे किडनी स्टोन तयार होऊ शकतात, यामुळे किडनी स्टोन टाळण्यासाठी डॉक्टर भरपूर पाणी पिण्याची शिफारस करतात. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या एका अभ्यासात असं आढळून आलं आहे की, नारळ पाणी प्यायल्याने केवळ किडनी स्टोनची संख्या कमी होत नाही तर ते किडनी आणि मूत्रमार्गात चिकटण्यापासून देखील रोखले जाते.

हँगओव्हर निघून जातो का? दारू पिल्यानंतर हँगओव्हर होणे सामान्य आहे. मात्र, तज्ञांचं म्हणणं आहे की, जर मद्यपान केल्यानंतर यकृत रक्तातील विषारी पदार्थ काढून टाकू शकले नाही तर शरीर डिहायड्रेट होते. यामुळे डोकेदुखी, आळस आणि मळमळ यासारख्या समस्या उद्भवतात, ज्याला हँगओव्हर म्हणतात. तज्ञांचं म्हणणं आहे की, नारळ पाणी पिणे हा या समस्येपासून त्वरित आराम मिळवण्याचा सर्वात सोपा मार्ग आहे.

तज्ञांचं म्हणणं आहे की पोटॅशियम हँगओव्हर डोकेदुखी कमी करण्यासाठी खूप प्रभावी आहे. ते असेही म्हणतात की नारळाच्या पाण्यात असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि मँगनीज यकृतातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करतात. नेचरमेड म्हणते की नारळाचे पाणी पिल्याने हँगओव्हरची लक्षणे लगेच बरी होत नाहीत, परंतु त्यामुळे त्वरित हायड्रेशन आणि ऊर्जा मिळते. शिवाय, नारळाचे पाणी इलेक्ट्रोलाइट्सने समृद्ध असते, जे शरीराला लवकर हायड्रेट करण्यास मदत करते.

त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी कमी होते का? नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या संशोधनातून असं दिसून आलं आहे की, नारळाचे पाणी रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करते. तज्ञ असंही म्हणतात की, तसंच नारळ पाणी मधुमेहाशी संबंधित ऑक्सिडेटिव्ह ताणाचे हानिकारक परिणाम कमी करते. नारळाच्या पाण्यात असलेले मॅग्नेशियम अतिरिक्त फायदे प्रदान करते असं म्हटलं जाते. मॅग्नेशियम रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करते असं तज्ञांचं म्हणणं आहे, विशेषत: मधुमेह असलेल्या लोकांसाठी.

नारळ पाणी प्रत्येकजण पिऊ शकतो का? नारळ पाणी पिण्याचे कोणतेही दुष्परिणाम ज्ञात नाहीत. मात्र, तज्ञांचा सल्ला आहे की मूत्रपिंड निकामी झालेल्या आणि पोटॅशियमचे सेवन कमी करण्याची आवश्यकता असलेल्यांनी ते पिणं टाळावं. परंतु, ज्यांना प्री-डायबिटीज आणि मधुमेह आहे त्यांनी पिण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

## व्हिटॅमिन 'डी' ची कमतरता किती धोकादायक आहे?

व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे १७ प्रकारच्या कर्करोगाचा धोका वाढतो.

नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या संशोधनानुसार, व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे १७ प्रकारचे कर्करोग होऊ शकतात. विशेषत: स्तन, प्रोस्टेट आणि कोलन कर्करोगाचा धोका वाढतो. कर्करोगाव्यतिरिक्त, हृदयरोग, स्ट्रोक, ऑटोइम्यून रोग आणि पीरियडोंटल रोग हे देखील कमतरतेशी संबंधित धोके आहेत.

हृदयाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम

रक्तदाब वाढणे: व्हिटॅमिन डी रक्तदाब नियंत्रित करणाऱ्या ठअअड प्रणालीला संतुलित करण्यासाठी फायदेशरी आहे. जेव्हा त्याची कमतरता असते तेव्हा ठअअड अतिसक्रिय होतो, ज्यामुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात आणि रक्तदाब वाढतो.

धमनीतील प्लेक: व्हिटॅमि डीच्या कमतरतेमुळे धमन्यांमध्ये प्लेक तयार होण्यास गती मिळते, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोका वाढतो. प्लेक हा चरबी, कोलेस्टेरॉल, कॅल्शियम आणि रक्तात आढळणाऱ्या इतर पदार्थांपासून बनलेला एक चिकट पदार्थ आहे. कालांतराने, तो तुमच्या धमनीन्यांमध्ये जमा होऊ शकतो, ज्यामुळे त्या अरुंद आणि कडक होतात. परिणामी रक्त प्रवाह कमी होऊ शकतो आणि गंभीर गुंतागुंत होऊ शकते.

वाईट कोलेस्ट्रॉल वाढणे: व्हिटॅमिन डीचे कमी प्रमाण एलडीएल (वाईट चरबी) पातळी वाढवू शकते आणि एचडीएल (चांगले कोलेस्ट्रॉल) कमी करू शकते. यामुळे ट्रायग्लिसराइड्स वाढवू शकते.

हृदयाचे ठोके: अभ्यासातून असं दिसून आलं आहे की, व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे हृदयाच्या लयीत अडथळा येऊ शकतो आणि अचानक हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. तज्ञांचं म्हणणं आहे की, व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे थेट हृदयरोग होत नसला तरी, ते इन्सुलिन प्रतिरोध, जळजळ आणि बिघडलेले लिपिड चयापचय यासारखे जोखीम घटक वाढवू शकते.

दररोज किती व्हिटॅमिन डी घ्यावे? नॅशनल अकादमी ऑफ मेडिसिन १-७० वयोगटातील लोकांसाठी दररोज ६००आययू व्हिटॅमिन डी (बहुतेक अन्नातून) आणि ७१ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या प्रौढांसाठी दररोज ८०० आययू व्हिटॅमिन डी घेण्याची शिफारस करते.

# गॅस बुकिंगच्या नियमात बदल

आता इतके दिवस पहावी लागणार वाट
इराण - इस्त्रायल - युएस युद्धाचा परिणाम आता भारतातील स्वयंपाक घरापर्यंत पोहोचला आहे. आधीच एलपीजी सिलिंडरचे दर ५० ते ६० रूपयांनी वाढले. त्यातच आता गॅस सिलिंडर रिफील करण्याचे नियम देखील बदलले आहेत.
प्रशासनाने घरगुती वापराच्या गॅस सिलिंडर रिफील नियमांमध्ये बदल केले आहेत. हे बदल जागतिक स्थिती पाहून करण्यात आले आहेत. यापूर्वी गॅसचा सिलिंडर बूक केल्यानंतर दुसरा सिलिंडर बूक करण्यासाठी १५ दिवसांचा प्रतिक्षा कालावधी होता. आता नव्या नियमानुसार हा वेळ वाढवला आहे.
नव्या नियमानुसार आता एका बुकिंगनंतर दुसरा सिलिंडर बुक करण्यासाठी १५ दिवसांऐवजी २१ दिवस वाट पहावी लागणार आहे.
नव्या नियानुसार कंपन्यांनी आपल्या सॉफ्टवेअरमध्ये आधीच अपडेट करणे सुरू केले आहे. नव्या नियमानुसार जरी प्रतीक्षा कालावधी वाढला असला तरी बुकिंगच्या प्रक्रियेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.वर्षाला १५ सिलिंडर




तेल कपन्यांनी घरगुती गॅस सिलिंडरसाठी काही नियमावली केली आहे. या नियमानुसार प्रत्येक ग्राहकाला १२ सबसिडाईज सिलिंडर आणि अतिरिक्त नॉन सबसिडाईज सिलिंडर प्रत्येक वर्षी मिळतात. याचा अर्थ १ एप्रिल ते मार्च ३१ पर्यंत एका गॅस कनेक्शनवर वर्षाला एकूण १५ गॅस सिलिंडर मिळू शकतात.

**२४ तासाच्या आत**

**सिलिंडर डिलिव्हरी नियम**

तेल कंपन्यांनी एजन्सीला गॅस सिलिंडर बुकिंग केल्यानंतर ते २४ तासाच्या आत सिलिंडर देणं बंधनकारक केलं आहे. या नियमामुळे देशातील विविध गॅस सिलिंडर ग्राहकांची सोय झाली आहे.

**२१ दिवसांनंतरच उपलब्ध होणार सिलिंडर**

नुकत्याच लागू झालेल्या नव्या नियमानुसार तुम्हाला आता तुमचे दुसरे सिलिंडर हे पहिले सिलिंडर मिळाल्यानंतर २१ दिवसानंतरच मिळणार आहे. कंपनीने आपल्या सॉफ्टवेअरमध्ये नवीन नियमानुसार दिवस लॉक केले आहेत. असे असले तरी अधिकाऱ्यांनी देशात गॅस सिलिंडरतुटवडा नाहीये असे स्पष्ट केले.

**त्यामुळे अधिकाऱ्यांनी देशा**तील ग्राहकांना कोणतीही काळजी न करण्याचा सल्ला दिला आहे. प्रत्येकाला जवढे गरजेचे आहेत तेवढे सिलिंडर मिळत राहणार असल्याचे सांगितले. तसेच पुरवठ्यावर कोणताही परिणाम होऊ नये म्हणून आता गॅस रिफ्युअलिंग प्लांट हे रविवारी देखील सुरू राहणार आहेत.

# झोपण्याचे तोटे व फायदे



डॉ. वरलक्ष्मी यांनी सांगितले की, आयुर्वेदाच्या मते दिवसा झोपणे फायदेशीर नाही. दिवसा झोपण्याच्या सवयीमुळे पचनशक्ती कमजोर होऊन कफ वाढतो. त्यामुळे जेवल्यानंतर लगेच झोपण्याची चूक करू नये.

रात्रीची झोप कमी होते

रात्रीची झोप शरीरासाठी खूप महत्त्वाची असते. या काळात शांतता आणि अंधार असतो, ज्यामध्ये शरीराला चांगली विश्रांती मिळते आणि गाढ झोप लागते. दिवसा झोपण्याची सवय सर्केडियन लयमध्ये व्यत्यय आणू शकते आणि रात्री झोपेची गुणवत्ता खराब करू शकते.

या लोकांनी दुपारी झोपू नये

या लोकांनी दुपारी झोपू नये
हाय कोलेस्ट्रॉलचे रुग्ण
लठ्ठ असलेले लोक
भरपूर फॅटयुक्त पदार्थ किंवा आहार खाल्ल्यावर
कफ प्रकृतीचे लोक



# देशातील पहिल्या महिला स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुलेंचा जीवनप्रवास

सावित्रीबाई जोतीराव फुले या एक भारतीय समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि कवयित्री होत्या. देशात त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी मोठे योगदान दिले. भारतातील पहिल्या महिला शिक्षिकाही म्हणून त्यांना ओळखले जाते.

सावित्रीबाई फुले यांनी त्यांचे पती महात्मा ज्योतिराव फुले यांच्यासोबत भारतातील महिलांचे अधिकार सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सावित्रीबाई आणि त्यांचे पती हे भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रणेते आहेत. सावित्रीबाईंना भारतीय स्त्रीवादाची जननी मानले जाते. या दोघांनी १ जानेवारी, १८४८ रोजी पुणे येथील भिडेवाड्यात मुलींची शाळा सुरू केली. ही शाळा देशात स्थापन झालेल्या सुरुवातीच्या शाळांपैकी एक होती.

महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून सावित्रीबाई फुले ओळखल्या जातात. जात आणि लिंगावर आधारित भेदभाव आणि अन्यायकारक वागणूक नाहीशी करण्यासाठी त्यांनी काम केले. फुले यांनी विधवांचे होणारे केशवपन थांबवण्यासाठी पुण्यात न्हाव्यांचा संप घडवून आणला होता. त्या एक लेखिका देखील होत्या. त्यांनी मराठी भाषेत विपुल लेखन केले आहे. १८९७ मध्ये प्लेगची साथ आल्यावर त्यांनी लागण झालेल्या लोकांसाठी काम केले. या प्रक्रियेत सावित्रीबाई फुले यांना देखील प्लेगची लागण झाली. १० मार्च, १८९७ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

मुलींसाठी पहिली शाळा-१ जानेवारी, इ.स. १८४८ रोजी पुण्यातील बुधवार पेठेतील भिडेवाड्यात जोतीराव आणि सावित्रीबाईंनी मुलींची शाळा काढली. साऱ्या कर्मठ मनुवादी समाजाच्या विरोधाला न जुमानता विवाहानंतर शिक्षण घेतले आणि शिक्षक, मुख्याध्यापक बनून शिक्षण दिले. केवळ चार वर्षांत १८ शाळा उघडल्या आणि चालवल्या. तत्कालीन ब्रिटिश भारतातली एतद्देशीय व्यक्तीने काढलेली ही पहिलीच मुलींची शाळा ठरली.

यापूर्वी मिशनऱ्यांनी आणि अन्य लोकांनी काढलेल्या १४-१५ शाळा उत्तर भारतात होत्या. या शाळेत सावित्रीबाई मुख्याध्यापिका म्हणून काम पाहू लागल्या. त्या काळात पुण्यातील अन्य भागांतही २-३ मुलींच्या शाळा त्यांनी सुरू केल्या व काही काळ चालवल्या. मुंबईतल्या गिरगावातही त्याच सुमारास स्टूडन्ट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटीने 'कमळाबाई हायस्कूल' नावाची मुलींसाठीची शाळा सुरू केली.

सावित्रीबाईंच्या शाळेत सुरुवातीला शाळेत सहा मुली होत्या, पण १८४८ साल संपेपर्यंत ही संख्या ४०-४५ पर्यंत जाऊन पोहोचली. या यशस्वी शाळेचे स्वागत सनातनी उच्च वर्णीयांनी धर्म बुडाला.... जग बुडणार.... कली आला.... असे सांगून केले. कर्मठ सनातन्यांनी विरोध केला, अंगावर शेणही फेकले. काही उन्मत्तांनी तर अंगावर हात टाकण्याची भाषा केली. पण अनेक संघर्ष करत हा सावित्रीबाईंचा शिक्षणप्रसाराचा उपक्रम चालूच राहिला. त्यासाठी त्यांना घर सोडावे लागले. सगुणाऊ सोडून गेली. अनेक आघात होऊनही सावित्रीबाई डगमगल्या नाहीत.

बालहत्या प्रतिबंधक गृह-

जोतिरावांनी बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. सावित्रीबाईंनी ते समर्थपणे चालवले. फसलेल्या वा बलात्काराने गरोदर राहिलेल्या विधवांचे त्या बाळंतपण करत. या बालहत्या प्रतिबंधक गृहातील सर्व अनाथ बालकांना सावित्रीबाई आपलीच मुले मानत. याच ठिकाणी जन्मलेल्या काशीबाई या ब्राह्मण विधवेचे मूल त्यांनी दत्तक घेतले. त्याचे नाव यशवंत ठेवले.



०३ जानेवारी १८३१ ते १० मार्च १८५७

केशवपन बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करणे व त्यांचा संप घडवून आणणे, पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी प्रयत्न करणे अशी अनेक कामे सावित्रीबाईंनी कल्पकतेने पार पाडली. सत्यशोधक समाजाच्या कार्यातही सावित्रीबाईंचा मोठा सहभाग असे. महात्मा फुले यांच्या निधनानंतर (इ.स. १८९०) सावित्रीबाईंनी सत्यशोधक समाजाच्या कार्याची धुरा वाहिली. आपल्या विचारांचा प्रसार त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून केला. 'काव्यफुले' व 'बावनकशी सुबोध रत्नाकर' हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. पुढील काळात त्यांची भाषणेही प्रकाशित करण्यात आली.

दुष्काळात मोठे योगदान-

इ.स. १८९६ सालातल्या दुष्काळात सावित्रीबाईंनी समाजाला सत्कार्याचा आदर्श घालून दिला. पोटासाठी शरीरविक्रय करणाऱ्या बाया-बापड्यांना दुष्टांच्या तावडीतून सोडवून त्यांनी त्यांना सत्यशोधक कुटुंबांत आश्रयास पाठविले. त्यांच्या कार्याला हातभार म्हणून पंडिता रमाबाई, गायकवाड सरकार अशा लोकांनी मदतीचा हात पुढे केला.

इ.स. १८९६-९७ सालांदरम्यान पुणे परिसरात प्लेगच्या साथीने धुमाकूळ घातला. हा जीवघेणा आजार अनेकांचे जीव घेऊ लागला. हा रोग संसर्गजन्य आहे हे कळल्यावर ब्रिटिश शासनाने जबरदस्तीने संभाव्य रुग्णांना वेगळे काढून स्थानांतरित करण्याचा खबरदारीचा उपाय योजला. यातून उद्भवणारे हाल ओळखून सावित्रीबाईंनी प्लेगपीडितांसाठी पुण्याजवळ वसलेल्या ससाणे यांच्या माळावर दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईंनाही प्लेग झाला. त्यातून १० मार्च, इ.स. १८९७ रोजी त्यांचे निधन झाले.

लेखिका आणि कवयित्री- सावित्रीबाई फुले या लेखिका आणि कवयित्रीसुद्धा होत्या. त्यांनी १८५४ मध्ये काव्यफुले आणि १८९२ मध्ये बावनकाशी सुबोध रत्नाकर प्रकाशित केले आणि जा, शिक्षण मिळवा नावाची कविता देखील प्रकाशित केली, ज्यामध्ये त्यांनी वंचित लोकांना शिक्षण घेऊन स्वतःला मुक्त करण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यांच्या अनुभवाचा आणि कामाचा परिणाम म्हणून त्या एक उत्कट स्त्रीवादी बनल्या. महिलांच्या हक्कांबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी त्यांनी महिला सेवा मंडळाची स्थापना केली. त्यांनी महिलांसाठी जातीय भेदभाव किंवा कोणत्याही प्रकारचा भेदभाव मुक्त असलेल्या मेळाव्याचे ठिकाण देखील बोलावले. याचे प्रतिक म्हणजे उपस्थित सर्व महिलांनी एकाच चटईवर बसायचे. त्या भ्रूणहत्या विरोधी कार्यकर्त्यासुद्धा होत्या.

सावित्रीबाईंची प्रकाशित पुस्तके-१. काव्यफुले (काव्यसंग्रह)२. सावित्रीबाईंची गाणी (१८९१)३. सुबोध रत्नाकर४. बावनकशी५. जोतिबांची भाषणे (संपादिका : सावित्रीबाई फुले १८५६)

पुणे विद्यापीठाला सावित्रीबाईंचे नाव-

३ जानेवारी हा सावित्रीबाईंचा जन्मदिवस संपूर्ण महाराष्ट्रात बालिका दिन व महिला मुक्तीदिन म्हणून साजरा केला जातो. १० मार्च १९९८ रोजी भारत सरकारने सावित्रीबाई फुले यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीट प्रसिद्ध केले. २०१५ मध्ये, पुणे विद्यापीठाचे नामकरण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असे करण्यात आले.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा




दैनंदिन आहारात कॅल्शियम, लोह यांसारखे घटक महत्त्वाचे असतात. हिमोग्लोबीन व विविध जीवनसत्त्वांची पातळी शरीरात योग्य राखली गेली, तर डॉक्टरांपासून दूर राहता येईल. दैनंदिन आहारात कॅल्शियम, लोह यांसारखे घटक महत्त्वाचे असतात. हिमोग्लोबीन व विविध जीवनसत्त्वांची पातळी शरीरात योग्य राखली गेली, तर डॉक्टरांपासून दूर राहता येईल.तुम्हाला आरोग्य चांगलं ठेवायचं असेल आणि डॉक्टरपासून दूर राहायचं असेल, तर शरीराकडे लक्ष देणं गरजेचं आहे.

## २ Joke — विनोद




सारीका : माझे पती वाघाप्रमाणे शूर, चित्याप्रमाणे चपळ आणि हत्तीप्रमाणे डोलत जाणारे आहेत.
रेखा : असं, त्यांना बघण्यासाठी किती रुपयाचं तिकीट काढावं लागणार.

## ३ Message — संदेश




Santa: Tum 1 bar me kitny admi utha saktey ho?
Pehalwan: 5
Santa: Bas! Tum se acha to hamara murgha hai jo subah subah pura mohalla utha deta hai.

## ४ Thought — सुविचार




ज्याला नीट खायला प्यायला मिळते, त्याने आपले कर्तव्यही चोख बजावावे. -थॉमस फुलर

**संस्कृत सुभाषित**

**एकोदरसमुद्भूता एकनक्षत्रजातकाः ।**
**न भवान्ति समाः शील यथा बदरिकाष्टकाः ॥**

अर्थ : एकाच बोराच्या झाडावर उत्पन्न झालेले काटे एक दुसऱ्यासारखे नसतात तसेच एका आईच्या पोटी जन्मलेले, एकाच नक्षत्रावर जन्मलेले सर्व लोक समान

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. रमेश देवबरोबरच्या या सिनेमात सीमा खलनायिका होती
६. ऐनवेळी कच खाणारा
११. न्याय
१२. सोशिकपणा
१४. नवरा
१५. अरण्य
१६. लोटी
१८. उगवत्या सूर्याचा देश
२१. च्या पुढे, समक्ष
२३. वेळेचा कमीत कमी भाग
२४. विरोध, प्रतिबंध
२७. पत, प्रतिष्ठा
२८. शंकराजवळचे चर्मवाद्य
२९. टप्प्याने टप्प्याने केलेला प्रवास
३२. अवधान, लक्ष
३३. भडक
३६. पळून जाणे
३९. कलावंत
४१. मत नोंदवण्याचा कालबाह्य कागद
४४. सोसाट्याचा वारा
४५. पवित्र
४६. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
४९. परिस्थिती, कालाचे परिमाण
५२. सामान
५३. बस्तान
५४. मज्जाव
५६. आश्रय, थारा
५८. प्रकाश निर्माण करणारा सूर्य
६०. वाहणारी हवा
६१. जन्मदाते
६३. पाणी
६५. दक्ष
६६. यजमान
६७. आरोप, बालंट
६८. प्रयाण
६९. लोकमानस
७१. इच्छा, आकांक्षा (हिंदी)
७३. आपल्या उत्तर सीमेवरील एक राष्ट्र
७५. किंचित ओलावलेले (डोळे) (हिंदी)
७६. कामाचा उरका
७८. शिव
८०. अवाजवी
८२. भाजपा नेते 'नितीन ----'
८४. संथ
८५. स्तुतीची गाणी
८६. दुःखी होणे, वेदनेने ओरडणे

### उभे शब्द

१. लकब
२. खिशाला चाट
३. धास्ती, भीती
४. आपले राष्ट्रगीत
५. आलटापालट
७. खून
८. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
९. डोसा
१०. शरीर, काया
१३. गलबताचे कापड
१७. भाकरी व इतर पदार्थांचा कुस्करा, दूधभाकरी
१९. वैमानिक (इंग्रजी)
२०. अंकुर
२२. रम्य, मनोहर
२५. दात
२६. अंधार
२७. फोडणीचे वरण
३०. प्रचंड
३१. जपजाप्य
३४. बगळा
३५. थेळ, सरळ
३७. लोकरीचा एक प्रकार
३८. लग्नकार्याचे लेखी आमंत्रण
४०. लबाडीचा हेतू
४२. सर्वस्वाने
४३. यापेक्षा 'आज' महत्त्वाचा
४५. पालनपोषण करणारा
४७. शोभणारा
४८. मृत्यूदेवता
५०. जयश्री गडकरचा चंद्रकांत गोखले यांच्या बरोबरचा गाजलेला चित्रपट
५१. नूतन
५२. तंबाखूचा असल्यास घातक
५५. मानबिंदू (ला.)
५७. कमळ
५८. दिवस
५९. कणीदार
६०. संसारातून अंग काढून घेणे
६१. सुखाच्या मोजमापाचे धान्य
६२. दाह, मत्सर
६४. मिरवणूक
६५. पत्राचा कालबाह्य झालेला मायना
६६. नम्रतेने मान खाली घालणे
६७अ. आल्या पावली, लगेच
७०. 'राही --- दुख की चिंता क्यों सताती है' (दोस्ती)
७२. थकवा
७४. सांभाळ
७७. खाली खेचणे, पराभूत करणे
७८. अधिकाराचे स्थान
७९. त्रासलेला
८०. शर्त
८२. माराची उठलेली खूण
८३. अस्वल

### आडवे उत्तरे

१.अपराध ६.अवसानघातकी ११.दाद १२.सहनशीलता १४.धव १५.वन १६.गडवा १८.जपान २१.समोर २३.क्षण २४.हरकत २७.आब २८.डमरू २९.मजलदरमजल ३२.भान ३३.बटबटीत ३६.पलायन ३९.कलाकार ४१.मतपत्रिका ४४.वादळ ४५.पाक ४६.पसायदान ४९.कालमान ५२.माल ५३.जम ५४.मना ५६.निवारा ५८.दिवाकर ६०.वारा ६१.जनकजननी ६३.जीवन ६५.सावध ६६.नवरा ६७.किटाळ ६८.प्रस्थान ६९.जनमत ७१.तमन्ना ७३.नेपाळ ७५.नम ७६.रपाटा ७८.पवित्र ८०.अवास्तव ८२.गडकरी ८४.मंद ८५.स्तवन ८६.कळवळणे

### उभे उत्तरे

१.अदा २.पदरमोड ३.धसका ४.जन गण मन ५.हलवाहलवी ७.वध ८.सावज ९.घावन १०.तन १३.शीड १७.भाकरकाला १९.पायलट २०.कोंब २२.रमणीय २५.रद २६.तम २७.आमटी ३०.जबरदस्त ३१.जपतप ३४.बक ३५.तडक ३७.नमदा ३८.पत्रिका ४०.कावा ४२.तनमनधनाने ४३.काल ४५.पालक ४७.साजरा ४८.यम ५०.मानिनी ५१.नवा ५२.मावा ५५.नाक ५७.राजीव ५८.दिन ५९.रवाळ ६०.वानप्रस्थ ६१.जव ६२.जळजळ ६४.वरात ६५.सा न वि वि ६६.नतमस्तक ६७अ.टाकोटाक ७०.मनवा ७२.मरगळ ७४.पालन ७७.पाडणे ७८.पद ७९.त्रस्त ८०.अट ८२.वळ ८३.रीस



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त



### हातात ट्रॉफी घेऊन शांत कोपऱ्यात बसला; संजू सॅमसनचा साधेपणा सर्वांना भावला

**मुंबई**–आयसीसी टी–२० विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामना भारत आणि न्यूझीलंड यांच्यात खेळवण्यात आला. या सामन्यात भारताने तब्बल ९६ धावांनी विजय मिळवला. भारताने सलग दुसऱ्यांदा टी–२० विश्वचषकावर आपलं नाव कोरलं. भारताच्या संजू सॅमसनला मालिकावीर म्हणून पुरस्कार देण्यात आला. दरम्यान, संजू सॅमसनचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.

टीम इंडियाला फायनलपर्यंत पोहोचवण्यात आणि विश्वचषक जिंकून देण्यात संजू सॅमसनची मोठी भूमिका राहिली. संजू सॅमसनने या स्पर्धेत ५ सामन्यांच्या ५ डावांत तब्बल ३२१ धावा केल्या. त्यामुळे तो या स्पर्धेत भारताकडून सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. संजू सॅमसन नम्र आणि शांत स्वभावासाठी ओळखला जातो. याचचं उदाहरण टीम इंडियाने विश्व–चषक जिंकल्यानंतर एका व्हिडीओने समोर आले. टीम इंडियाचे विश्वचषक जिंकल्यानंतर सर्व खेळाडू जोरदार सेलिब्रेशन करत होते. यामध्ये हार्दिक पांड्या आणि इशान किशन यांनी डान्सही केला.

### भारतीय क्रिकेट संघाचा महापालिकेच्या वतीने नागरी सत्कार

मुंबई–भारतीय राष्ट्रीय क्रिकेट संघाने आयसीसी टी–२० विश्वचषक स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी करत तिसऱ्यांदा आणि सलग दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावल्याबद्दल मुंबई महानगरपालिकेतर्फे संघाचा भव्य नागरी सत्कार करण्यात यावा, अशी मागणी शिवसेना नगरसेवक व महापालिका गटनेते अमेय घोले यांनी केली आहे.यासंदर्भात घोले यांनी १० मार्च २०२६ रोजी महापौरांना पत्र पाठवले आहे. या पत्रात त्यांनी नमूद केले आहे की, भारतीय क्रिकेट संघाने आयसीसी टी–२० विश्वचषक स्पर्धेत विजेतेपद मिळवत इतिहास घडवला आहे. तिसऱ्यांदा विजेतेपद पटकावताना सलग दुसऱ्यांदा ही कामगिरी केल्याने देशाचे नाव संपूर्ण जगभरात उंचावले आहे. भारतीय खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ, जिद्द आणि संघभावनेच्या जोरावर ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली असून हा क्षण प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या ऐतिहासिक विजयामुळे देशभरातील क्रीडाप्रेमींमध्ये आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषत: तरुण पिढीसाठी हा विजय प्रेरणादायी ठरणार असल्याचेही चव्हाण यांनी पत्रात नमूद केले आहे.

### सूर्या आणि कंपनीचे पुढचे टार्गेट आहे फारच मोठे! पुढच्या दिवसांचाही प्लॅन सांगितला

मुंबई–सूर्यकुमार यादव यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने आयसीसी पुरुष टी२० विश्वचषक २०२६ चे विजेतेपद पटकावल्यानंतर तो आज मंगळवारी, १० मार्च रोजी मुंबईत परतला. त्याचे त्याच्या स्वत:च्या शहरात जग्गी स्वागत झाले. हार फूल आणि शाल देऊन अगदी मराठमोळ्या पद्धतीने स्वागत केलं गेलं. आता तो त्याच्या घरी पोहचला आहे. यादरम्यान विमान–तळावर पत्रकारांनी त्याला पुन्हा एकदा विश्वविजेता बनल्याबद्दल भावना विचारल्या असता त्याने साध्या शब्दांत प्रतिक्रिया देत म्हटले, मफखूप छान वाटत आहे.फ्फ संघाच्या या ऐतिहासिक विजयामुळे चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियम येथे झालेल्या अंतिम सामन्यात टीम इंडियाने न्यूझीलंड संघावर ९६ धावांनी दणदणीत विजय मिळवला. या विजयासह भारताने तिसऱ्यांदा टी२० वर्ल्ड कप जिंकला आणि सलग दुसऱ्यांदा हा किताब पटकावण्याचा ऐतिहासिक पराक्रम केला.

## अर्शदीप सिंगला दंड; डॅरेल मिचेलच्या दिशेने चेंडू फेकल्याप्रकरणी कारवाई

अर्शदीप सिंगने सामना संपल्यानंतर डॅरेल मिचेलची माफी माहितली होती. टी२० वर्ल्डकप फायनलच्या लढतीत न्यूझीलंडचा फलंदाज डॅरेल मिचेलच्या दिश–ने चेंडू फेकल्याप्रकरणी भारताचा युवा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगवर दंडाची कारवाई करण्यात येणार आहे. आयसीसी कोड ऑफ कंडक्ट लेव्हल१ कलमाचं उल्लंघन केल्याप्रकरणी अर्शदीपवर ही कारवाई करण्यात येणार आहे. त्याच्या मानधनातून १५ टक्के दंड म्हणून कापून घेण्यात येणार आहे.



आयसीसी कोड ऑफ कंडक्ट आर्टिकल २.९ नुसार खेळाडूने अन्य खेळाडूच्या शरीराचा वेध घेईल अशा रीतीने चेंडू फेकणं उल्लंघन मानलं जातं.अर्शदीपने ११व्या षटकादरम्यान न्यूझीलंडचा फलंदाज डॅरेल मिचेलच्या दिशेने चेंडू फेकला होता. याप्रकारामुळे चिडलेल्या मिचेलने अर्शदीपला सुनावलं. भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादवने तात्काळ मिचेलशी संवाद साधला. पंच रे एलिंगवर्थ यांनी अर्शदीपला समज दिली. त्यानंतर अर्शदीपने मिचेलशी हस्तांदोलन केले. समना संपल्यानंतर अर्शदीपने मिचेलची भेट घेतली. रिव्हर्स स्विंगमुळे चेडू मिचेलच्या दिशेने गेला. त्याला अपाय करण्याचा कोणताही हेतू नव्हता. यामुळे जाऊन मिचेलची माफी मागितली असं अर्शदीपने सांगितलं.अर्शदीपने माफी मागितल्यानंतरही सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांनी याप्रकरणाची दखल घेत दंडाची कारवाई केली आहे.शर्दीपने आधीच मिचेलची माफी मागितली असल्यामुळे सामनाधिकाऱ्यांच्या समोर सुनावणी झाली नाही.



कॅनडातील व्हॅंकुव्हर येथे होणाऱ्या वर्ल्ड रग्बी सेव्हन्स सिरीजमध्ये भाग घेताना ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडच्या महिला खेळाडूंनी.



ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे होणाऱ्या एएफसी महिला आशियाई कपमध्ये भाग घेताना चीन आणि डेमोक्रॅटिक पी–पल्स रिपब्लिक ऑफ कोरियाच्या महिला खेळाडू.

### टी–२० वर्ल्डकप जिंकल्यानंतर टीम इंडियाचा हा खेळाडू अडकणार लग्नबंधनात

नवी दिल्ली–टी–२० विश्वचषक २०२६चे जेतपद पटकावल्यानंतर टीम इंडियाचे खेळाडू विजयाचा आनंद साजरा करत आहे. एकीकडे टी–२० वर्ल्डकप विजयाचं सेलिब्रेशन सुरू असताना आता टीम इंडियाचा खेळाडू लग्नबंधनात अडकणार आहे. त्याच्या लग्नाची तारीखदेखील समोर आली आहे. टी–२० विश्वचषकानंतर आता सर्व खेळाडू आयपीएलकरता आपआपल्या संघात सामील होणार आहेत. यापूर्वीच हा खे–ळाडू त्याच्या आयुष्यातील नव्या इनिंगला सुरूवात करणार आहे.भारतीय संघातील चायनामन गोलंदाज कुलदीप यादव लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. लग्न खरतर नोव्हेंबर २०२५ मध्ये होणार होतं, परंतु भारतीय संघाच्या वेळापत्रकामुळे ते पुढे ढकलण्यात आलं. पण, लग्नाची तयारी आता जोरात सुरू आहे. कुलदीपचा साखरपुडा गेल्यावर्षी ४ जून २०२५ ला झाला होता.कुलदीप यादव त्याची बालपणीची मैत्रीण वंशिका हिच्याशी लग्न करणार आहे.

## रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव आणि जहीर खानने मुंबईत खरेदी केले अलिशान फ्लॅट्स

मुंबई–मुंबईच्या समृद्ध रिअल इस्टेट क्षेत्राबाबत भारतीय क्रिकेट क्षेत्रातील दिग्गजांचा रस अलिकडील काळात खूप मोठ्या प्रमाणात वाढला आहे. यामुळे क्रिकेट क्षेत्रातील मंडळींकडून मुंबईच्या रिअल इस्टेट क्षेत्रातील गुंतवणूक वाढत आहे. मसिटी ऑफ ड्रीम्सफ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई शहरात गेल्या काही महिन्यांमध्ये अनेक क्रिकेटपटूंनी महागड्या निवासी मालमत्ता खरेदी केल्या आहेत. यामध्ये आता नुकतेच टी–२० विश्वचषक जिंकलेल्या भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव याचाही समावेश आहे. गेल्या काही महिन्यांत सूर्यकुमार यादव, रोहित शर्मा आणि झहीर खान यांच्या कुटुंबीयांनी मुंबईच्या रिअल इस्टेटमध्ये एकत्रितपणे ६५ कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक केली आहे.

सूर्यकुमार यादव–देविशा यादव अलीकडेच सूर्यकुमार यादवची पत्नी देविशा यादवने मुंबईतील देवनार परिसरात ७.१८ कोटी रुपयांचा एक आलिशान फ्लॅट खरेदी केला आहे. गोदरेज स्काय टेरेसेस प्रकल्पात असलेला हा फ्लॅट सुमारे १,५०० चौरस फूट क्षेत्रफळाचा आहे आणि मालमत्ता नोंदणी कागदपत्रांनुसार २० फेब्रुवारी २०२६ रोजी त्याची नोंदणी झाली आहे. ही खरेदी करण्यासाठी देविशा यादवला ३५.९ लाख रुपये स्टॅम्प ड्युटी आणि ३०,००० रुपये नोंदणी शुल्क भरावे लागले. सीआरई मॅट्रिक्सने पाहिलेल्या कागदपत्रांनुसार, ही खरेदी याच प्रकल्पातील या जोडप्याचा तिसरा



### एकत्रित किंमत ६५ कोटी रुपयांच्या पुढे


फ्लॅट आहे, ज्यामुळे शहरातील त्यांचा रिअल इस्टेट पोर्टफोलिओ आणखी मजबूत झाला आहे. मार्च २०२५ मध्ये देविशा यादवने त्याच इमार–तीत १७ व्या आणि १८ व्या मजल्यावर आणखी दोन फ्लॅट २१ कोटींपेक्षा जास्त किमतीत खरेदी केले असल्याचे कागदपत्रांमधून समोर आले आहे. रोहित शर्मा– रितिका सजदेह क्रिकेटपटू रोहित शर्माची पत्नी रितिका सजदेहने मुंबईतील प्रभादेवी परिसरात २६.३० कोटी रुपयांना एक आलिशान फ्लॅट खरेदी केला आहे. आहुजा टॉवर्समध्ये असलेल्या या फ्लॅटचे क्षेत्रफळ सुमारे २,७६० चौरस फूट आहे आणि त्यात तीन कार पार्किंग स्पेस आहेत.

## वर्ल्डकप जिंकल्यानंतर भावुक झाला रिंकु सिंह; वडिलांच्या आठवणीत शेअर केली पोस्ट

दिल्ली–भारतीय क्रिकेट संघाचा फिनिशर रिंकू सिंह यांना आयसीसी टी२० विश्वचषकात एक खास अनुभव आला. तो पहिल्यांदाच विश्वचषक विजेत्या संघाचा भाग होता. पण या स्पर्धेदरम्यान त्याने आपल्या वडिलांना गमावले.

एका बाजूला विजयाचा आनंद आहे तर दुसरीकडे हा विजय साजरा करणारे वडील नाहीत याचं दुःख आहे. टीम इंडियाचा फलंदाज रिंकू सिंहने मंगळवारी १० मार्चला इंस्टाग्रामवर त्याचे दिवंगत वडील खानचंद सिंह यांच्यासाठी एक भावनिक पोस्ट शेअर केली. त्याच्या वडिलांचे २७ फेब्रुवारी रोजी दीर्घ आजाराने ग्रेटर नोएडा येथील रुग्णालयात निधन झाले.

रिंकूने २६ गुरुवारी रोजी चेन्नई येथे झिम्बाब्वेविरुद्ध आयसीसी टी२० विश्व–चषक २०२६ सुपर ८ सामना खेळण्याच्या एक दिवस आधी, अलिगड येथे त्याच्या वडिलांच्या अंत्यसंस्काराला हजेरी लावली. यानंतर, रिंकू १ मार्च रोजी कोलकाताला पोहोचला, जिथे भारताला ईडन गार्डन्सवर वेस्ट इंडिजविरुद्ध मकरो या मरफ या परिस्थितीत सामना खेळायचा होता. अहमदाबादमध्ये झालेल्या आयसीसी



टी–२० विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडला ९६ धावांनी हरवल्यानंतर, रिंकूने त्याच्या वडिलांच स्मरण केलं. इंस्टाग्राम पोस्टमध्ये रिंकूने लिहिले, मफ्तुमच्याशी बोलल्याशिवाय इतके दिवस कधीच राहिलो नाही. मला माहित नाही की तुमच्याशिवाय पुढचं आयुष्य कसे असेल?. पण माझ्या आयुष्यात मला तुमची गरज आहे. तुम्ही सांगितलं होतं की, कर्तव्य सगळ्यात पुढे आहे. म्हणूनच मी फक्त मैदानावर तुमची स्वप्ने पूर्ण करण्याचा प्रयत्न करतोय. आता तुमचं स्वप्न पूर्ण झालं तर सारखं असं वाटतं की, जर तुम्ही असता तर... प्रत्येक छोट्या, मोठ्या आनंदात तुमची कमतरता मनापासून जाणवेल. माझी फक्त एवढीच इच्छा आहे की, तुम्ही माझ्यासोबत कायम राहावे. बाबा... मला तुमची खूप आठवण येईल.फ्फ

रिंकूने आयसीसी टी२० विश्व–चषक २०२६ मध्ये भारतासाठी पहिले पाच सामने खेळले, त्यात त्याने अमेरिका, नामिबिया, पाकिस्तान, नेदरलँड्स आणि दक्षिण आफ्रिका विरुद्ध ६,१,११,६ आणि ० धावा केल्या. २६ फेब्रुवारी रोजी चेन्नई येथे झिम्बाब्वे विरुद्धच्या सुपर ८ सामन्यासाठी त्याला भारताच्या प्लेइंग इलेव्हनमधून वगळण्यात आले आणि त्याच्या जागी संजू सॅमसनला संधी देण्यात आली. सॅमसनने चेपॉक येथे झिम्बाब्वे विरुद्ध २५ धावा केल्या आणि त्यानंतर वेस्ट इंडिज विरुद्ध ५० चेंडूत ९७, इंग्लंड विरुद्ध ४२ चेंडूत ८९ आणि न्यूझीलंड विरुद्धच्या अंतिम सामन्यात ४६ चेंडूत ८९ धावा केल्या. संजू सॅमसनने २०२६ च्या टी२० विश्वचषक स्पर्धेत भारतासाठी सर्वाधिक धावा केल्या, एकूण ३२१ धावा केल्या आणि प्लेअर ऑफ द टूर्नामेंटचा पुरस्कारही जिंकला.

## टीम इंडिया सिक्सर किंग; चौकार–षटकाराच्या माध्यमातून वसूल केल्या १२२४ धावा

नवी दिल्ली–सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वातील भारतीय संघाने रविवारी न्यूझीलंडला नमवत टी२० जेतेपदावर कब्जा केला. भारतीय संघाचे टी२० प्रकारातले हे तिसरे जेतेपद आहे तर आयसीसी स्पर्धेचे आठवे. या जेतेपदाचं ठळक वैशिष्ट्य म्हणजे टीम इंडियाने पाडलेला षटकारांचा पाऊस. भारतीय फलंदाजांनी स्पर्धेदरम्यान तब्बल १०६ षटकार चोपल्याचं स्पष्ट झालं आहे. बाकी कोणत्याही संघापेक्षा हे प्रमाण काही पटींनी जास्त आहे. सर्वाधिक षटकारांच्या यादीत भारतीय संघानंतर वेस्ट इंडिज ७६ षटकारांसह दुसऱ्या स्थानी आहे. दक्षिण आफ्रिकेचा संघ ७२ षटकारांसह तिसऱ्या स्थानी आहे.

षटकारांच्या माध्यमातून भारतीय संघाने ६३६ धावा चोपून काढल्या. टी२० प्रकारात षटकारांचं महत्त्व अनोखं आहे. धावांचा पाठलाग असो किंवा मोठी धावसंख्या रचणे असो, षटकाराच्या माध्यमातून झटपट धावा करता येतात. मात्र षटकार लगावणं हे स्वतंत्र कौशल्य आहे. टी२० प्रकारात यशस्वी व्हायचं असेल षटकार कळीचे असतील हे भारतीय संघाने ओळखलं आणि त्यावर भर दिला. या धोरणाचा निश्चित फायदा भारतीय संघाला झाला आहे. संजू सॅमसन, अभिषेक शर्मा आणि इशान किशन या त्रिकुटाने सातत्याने षटकारांचा रतीब घालत प्रतिस्पर्ध्यांना नामोहरम केलं. भारतीय संघाने पॉवरप्ले, मधली षटकं आणि हाणामारीची षटकं अशा तिन्ही टप्प्यांमध्ये षटकारांच्या बाबतीत श्रीलंका आणि झिम्बाब्वे हे दोन संघ तळाच्या स्थानी आहेत. या दोन्ही संघांनी ३७ षटकार वसूल केले. योगायोग म्हणजे या दोन्ही संघांना सुपर८ फेरीचा अडथळा पार करता आला नाही. दर दहा चेंडूंमागे भारतीय फलंदाजांनी षटकार वसूल केला आहे. चौकारांच्या बाबतीतही भारतीय संघ अव्वल ठरला आहे. भारतीय फलंदाजांनी स्पर्धेदरम्यान १४७ चौकार लगावले आहेत.

# भारतीय संघाला छप्पर फाड बक्षीस : बीसीसीआय कडून १३१ कोटी रुपये जाहीर




मुंबई –भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने पुरुष टी२० विश्वचषक २०२६ मध्ये विजयी झालेल्या टीम इंडियाला १३१ कोटी रुपयांचे मोठे रोख बक्षीस जाहीर केलंय. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडला पराभूत करून भार–तानं हा ऐतिहासिक विजय मिळवला होता. या विजयासह भारतानं स्पर्धेचा सलग दुसरा आणि एकूण तिसरा विजय मिळवला आहे. ऊ२० विश्वचषक तीन वेळा जिंकणारा भारत इतिहासातील पहिला संघ आहे.या यशामुळं भारतीय क्रिकेटचा दबदबा अधिक मजबूत झाला असून, खेळाडू, सपोर्ट स्टाफ आणि निवडकर्त्यांचं कौतुक होत आहे.

ऐतिहासिक विजय : टी२० विश्व–चषक २०२६ मध्ये भारतानं उत्कृष्ट कामगिरी केलीय. सूर्यकुमार यादव यांच्या नेतृत्वाखालील टीमनं संपूर्ण स्पर्धेत दमदार खेळ प्रदर्शित केला. अंतिम सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध भारतानं प्रथम फलंदाजी करत २० षटकांत २५५५ धावा केल्या. नंतर गोलंदाजी करत न्यूझीलंडला १५९ धावांवर माघारी पाठवलं, ज्यामुळं ९६ धावांनी मोठा विजय मिळवला. हा स्पर्धेतील सर्वात मोठ्या फरकाचा विजय ठरला. संजू सॅमसन, जसप्रीत बुमराह यांसारख्या खेळाडूंनी निर्णायक भूमिका बजावली.

या विजयाने भारताने टी२० विश्वचषकातील यशाची नवी उंची गाठली. २००७ मध्ये एमएस धोनीच्या नेतृत्वात पहिला विजय मिळाला होता. त्यानंतर २०२४ मध्ये रोहित शर्माच्या कर्णधारपदाखाली दुसरा आणि आता २०२६ मध्ये सूर्यकुमार यादव यांच्या नेतृत्वात तिसरा विजय मिळालाय. इंग्लंड आणि वेस्ट इंडीज यांनी दोन–दोन वेळा विजय मिळवला आहे, पण भारत हा एकमेव संघ आहे, जो तीन वेळा चॅम्पियन ठरला आहे. याशिवाय, सलग दोन विजय मिळवणारा तो पहिला संघही बनला आहे.

बीसीसीआय चे बक्षीस : बीसीसीआय ने या ऐतिहासिक यशासाठी १३१ कोटी रुपयांचे रोख बक्षीस जाहीर केले आहे. हे बक्षीस खेळाडू, सपोर्ट स्टाफ, निवडकर्ते आणि संपूर्ण टीमला दिले जाईल. यापूर्वी २०१४ च्या विजयासाठी बीसीसीआय ने १२५ कोटी रुपयांचे बक्षीस दिले होते, तर आयसीसी कडून वेगळे बक्षीस मिळाले होते. २०२६ साठी घ्ण नं विजेत्या संघाला अंदाजे २७.७८ कोटी (३ मिलियन डॉलर) दिले आहेत, जे २०२४ पेक्षा अधिक आहे. बीसीसीआय चे हे अतिरिक्त बक्षीस खेळाडूंच्या मेहनतीचे आणि समर्पणाचं प्रतीक आहे. बीसीसीआय सचिवांनी म्हटले आहे की, मफ्या ऐतिहासिक यशासाठी टीम इंडियाचे अभिनंदन. खेळाडू, कोच, सपोर्ट स्टाफ आणि निवडकर्त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केलीय. भविष्यातही अशाच यशाची अपेक्षा आहे.फ्फ

बीसीसीआय कडून शुभेच्छा : या विजयाने भारतीय टीमचा आत्मविश्वास वाढला आहे. आयपीएल २०२६ लवकरच सुरू होत असल्याने खेळाडूंना विश्रांतीनंतर नव्या आव्हानांसाठी तयार व्हावे लागणार आहे. बीसीसीआय ने भारतीय टीमला पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्यास १२ मार्चपर्यंत अंतिम मुदत

### शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या पत्र विद्यार्थ्यांना करता येईल अर्ज

**लातूर/प्रतिनिधी :** सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षात शासकीय वसतिगृह तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी http://hams.mahait.org हे नवीन ऑनलाईन पोर्टल विकसित करण्यात आले आहे. अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी या पोर्टलवर शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरलेला आहे. परंतु, वसतिगृह क्षमतेअभावी तसेच विद्यार्थ्यांच्या अडचणीमुळे वसतिगृहात प्रवेश घेवू शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ मिळविण्यासाठी त्यांचे अर्ज विद्यार्थी लॉगीनला महा-आयटीकडून परत पाठविण्यात आलेले आहेत.

तरी ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही तसेच ज्यांचे अर्ज विद्यार्थी लॉगीनला परत आले आहेत. त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकरिता आवश्यक कागदपत्रे http://hams.mahait.org या पोर्टलवर १२ मार्च, २०२६ पुर्वी अपलोड करुन अर्ज ऑनलाईन फॉरवर्ड करावेत, व त्याची हार्डकॉपी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयातील स्वाधार शाखेस सादर करावेत, असे समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी आवाहन केले आहे.

## राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात क्रांतिज्योती सावित्रीबाईंना अभिवादन

लातूर : येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते सावित्रीमाईंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अशविनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, समन्वयक राजीव मुंढे, राजेंद्र जायेभाये, पर्यवेक्षक संजय गुरमे, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका, मुख्याध्यापिका आणि महान समाजसुधारक होत्या. पती महात्मा ज्योतिराव फुले यांच्यासोबत त्यांनी १८४८ मध्ये पुण्यात भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. सेवा आणि करुणेचा त्या आदर्श आहेत. स्त्री शिक्षण, विधवा पुनर्विवाह आणि अस्पृश्यता निवारणासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. आजच्या शिक्षकांनी फुले दाम्पत्याच्या विचारांचा अंगिकार करावा, असे आवाहन त्यांनी केले.

## नारायणी प्ले स्कूलमध्ये 'भजन क्लब' उपक्रम उत्साहात संपन्न, भजनातून संस्कारांचे धडे; लहान विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग




**लातूर/प्रतिनिधी :** आजच्या आधुनिक आणि स्पर्धात्मक जगात विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकांचे ज्ञान देणे पुरेसे नसून त्यांच्यामध्ये चांगले संस्कार, सांस्कृतिक मूल्ये आणि आध्यात्मिक जाणीव निर्माण करणेही तितकेच आवश्यक आहे. याच उद्देशाने दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी नारायणी प्ले स्कूल मध्ये ''भजन क्लब'' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये मधील विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी हरिपाठ, संतांच्या अभंगांचे गायन, गणेश वंदना, सरस्वती वंदना तसेच गुरु वंदना सादर केली. काही विद्यार्थ्यांनी टाळ, वीणा आणि इतर वाद्यांच्या साथीने भजने सादर करून हा भजन क्लब'' कार्यक्रम अधिक रंगतदार केला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीची ओळख झाली. तसेच त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, एकाग्रता आणि टीमवर्कची भावना वाढण्यास मदत झाली. लहानग्या विद्यार्थ्यांनी अत्यंत आनंदाने आणि उत्साहाने या कार्यक्रमात सहभाग घेतला. शालेय शिक्षणाबरोबरच लहान मुलांमध्ये कलागुणांचा विकास व्हावा यासाठी या प्रकारचे कार्यक्रम या शाळेत नेहमीच राबविले जातात.

कार्यक्रमादरम्यान शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि त्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या सुंदर सादरीकरणामुळे कार्यक्रम अत्यंत आनंददायी वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी शाळेच्या संचालिका व मुख्याध्यापिका सौ. शिवकन्या महेश पवार मॅडम शाळेच्या सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. अशा प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. त्यामुळे भविष्यातही अशा सांस्कृतिक आणि मूल्याधारित कार्यक्रमांचे नारायणी प्ले स्कूलमध्ये आयोजन करण्यात येणार आहे.

# लातूर जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## एकाच छताखाली नागरिकांना मिळाला महसुली सेवांचा लाभ

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान (टप्पा-१) ला लातूर जिल्ह्यात उत्साहात सुरुवात झाली आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील सर्व १० तालुक्यांमध्ये प्रत्येकी एका महसूल मंडळात समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांमुळे एकाच दिवशी नागरिकांना विविध प्रमाणपत्रे, दाखले आणि डिजिटल सातबारा उतारे वाटप करण्यात आले.



ग्रामीण भागातील शेतकरी, सामान्य नागरिक, विद्यार्थी आणि महिलांच्या महसूल विभागाशी निगडित प्रलंबित प्रश्न तात्काळ निकाली काढण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. मार्च ते मे २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील महसूल मंडळ स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन केले जात आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर आणि जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान सुरू आहे. एकाच ठिकाणी नागरिकांना आवश्यक महसुली सेवा उपलब्ध करून देणे हा अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

शिबिरांमध्ये उपलब्ध होणाऱ्या प्रमुख सेवांमध्ये सातबारा अभिलेखातील चुका दुरुस्त करणे, डिजिटल सातबारा व आठ-अ उतारे तात्काळ पुरवणे, दीर्घकाळ प्रलंबित फेरफार प्रकरणांचा निपटारा, उत्पन्न, रहिवासी, जात प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्र आदी दाखल्यांचे वाटप, अकृषिक (एनए) जमिनीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीची अट रद्द करणे व एकवेळचे अधिमूल्य भरण्याबाबत जनजागृती, ई-मोजणी, ॲग्रीस्टॅक, पी.एम. किसान योजना, भूसंपादन प्रकरणातील नोंदी अद्ययावत करणे आदी सेवा समाविष्ट आहेत.

एकाच दिवशी ३,५५७ हून अधिक डिजिटल सातबारांचे वाटप

या अभियानांतर्गत लातूर जिल्ह्यात एकाच दिवशी एकूण ३,५५७ डिजिटल सातबारा आणि २,९२७ आठ-अ उतारे वाटप करण्यात आले. तसेच विविध प्रकारची ५,७९४ प्रमाणपत्रे नागरिकांना सुपूर्द करण्यात आली. देवणी तालुक्याने सर्वाधिक ७२० डिजिटल सातबारा वाटप केले, तर औसा तालुक्यात 'एक खिडकी' योजनेअंतर्गत सर्वाधिक ४६७ अर्जांचा निपटारा झाला. रेणापूर तालुक्यात भूसंपादनाशी संबंधित २९० प्रकरणांचे निराकरण करण्यात आले. या अभियानामुळे नागरिकांना एकाच छताखाली अनेक सेवा मिळाल्याने त्यांची धावपळ मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. जिल्हा प्रशासनाच्या या पुढाकारामुळे प्रलंबित फेरफार आणि त्रुटींचे निराकरण जागेवरच होत असल्याने शेतकरी आणि सामान्य नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

समाधान शिबिरांना सहकार मंत्री व लोकप्रतिनिधींची उपस्थिती

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत अहमदपूर तालुक्यातील किनगाव आणि चाकूर तालुक्यातील वडवळ नागनाथ येथील समाधान शिबिरांना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची उपस्थिती लाभली. तसेच औसा तालुक्यातील किनीथोट येथील शिबिराला आमदार अभिमन्यू पवार, तर लातूर तालुक्यातील टाकळी शि. येथील शिबिराला छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयातील अपर विभागीय आयुक्त अनंत गव्हाणे यांची उपस्थिती होती. अहमदपूर तालुक्यातील किनगाव येथे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

समाधान शिबिरांमधील ठळक आकडेवारी

निकाली काढलेले फेरफार प्रकरणे : ७१२

डिजिटल सातबारा वाटप : ३,५५७

आठ-अ उताऱ्यांचे वाटप : २,९२७

वाटप केलेली प्रमाणपत्रे : ५,७९४

एक खिडकी योजनेअंतर्गत निकाली अर्ज : १,७३९

## लातूरमध्ये १२ मार्च रोजी विद्यार्थी आक्रोश मोर्चा

**लातूर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद लातूरच्या वतीने विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी १२ मार्च २०२६ रोजी विद्यार्थी आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. हा मोर्चा सकाळी १० वाजता दयानंद गेट ते महात्मा गांधी चौक, लातूर या मार्गावर काढण्यात येणार असल्याची माहिती परिषदेकडून देण्यात आली.

या मोर्चामध्ये विद्यार्थ्यांच्या अनेक प्रलंबित मागण्यांबाबत शासनाचे लक्ष वेधण्यात येणार आहे. अतिवृष्टीमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले असल्याने स्पर्धा परीक्षा शुल्क माफ करणे, तसेच ऑनलाइन परीक्षांसाठी घेतले जाणारे शुल्क कमी करणे, अशी प्रमुख मागणी करण्यात येणार आहे.

याशिवाय विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण योजना प्रभावीपणे राबविणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे येथील प्रवेश, परीक्षा व निकाल प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करणे, तसेच विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या विविध शिष्यवृत्ती वेळेवर वितरित करणे या मागण्याही मोर्चातून मांडल्या जाणार आहेत.

महाविद्यालयीन विद्यार्थी संघ निवडणुका महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ नुसार पुन्हा सुरू कराव्यात, तसेच शासकीय वसतिगृहांचे नूतनीकरण करून विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे.

तसेच आयटीआयमध्ये उपकरणांचे नूतनीकरण, नर्सिंग अभ्यासक्रमातील ८०:२० पॅटर्न रद्द करणे, कृषी व अकृषी विद्यापीठांतील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणे, पशुवैद्यकीय शिक्षणातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व भत्ते वाढविणे यासह इतर शैक्षणिक प्रश्नांवरही परिषद मोर्चा काढणार आहे.

लातूर शहरात अलीकडील काळात वाढत असलेल्या शैक्षणिक परिसरातील गुन्हेगारीवर आळा घालावा अशी मागणीही यावेळी करण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मोर्चा यशस्वी करावा, असे आवाहन अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, लातूरच्या वतीने करण्यात आले आहे.

## राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये महिला दिनानिमित्त काव्योपचार कार्यक्रम संपन्न!

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील राजा नारायण लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये ११५ व्या महिला दिनाचे औचित्य साधून ज्येष्ठ कवयित्री , कृष्णा अर्थ या अभिनव प्रयोगाच्या दिग्दर्शिका रेशमा कारखानीस यांच्या काव्योपचार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मन:स्थिती बदला म्हणजे परिस्थिती आपोआप बदलेल असा ताणतणाव संपवण्याचा मूलमंत्र देऊन महिलांचे मनोबल वृध्दिंगत करण्यासाठी आपण जीवनात आवश्यक त्या गोष्टींचेच व्यवस्थापन करत असतो. ताण हा सुद्धा जीवनात प्रगतीसाठी पथदर्शी असल्याने आवश्यक आहे म्हणून सकारात्मकतेने ताणतणावाकडे पाहिले पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी केले मन थकलेला असतं तेव्हा शब्दच उपचार ठरतात. चांगल्या विचारांचा रिले आपण सातत्याने पुर:सरित ठेवला पाहिजे. मानवी दु:ख हे नांगराच्या फाळ आहे कारण ते सुखाची पेरणी करते असेही उद्बोधन त्यांनी यावेळी केले.राजकारण हे रॅप साँग , सुख-दु:ख अशा स्वलिखित कवितांचे सादरीकरण करून जीवनातील वास्तवाचे भान उपस्थितांना दिले. विद्यालयातील शिक्षकबंधूनी या कृतज्ञतासोहळ्याचे खास आयोजन केले होते. महिला शिक्षकांचे पुष्पवृष्टी करत स्वागत करून या दिमाखदार सोहळ्याची सुरुवात झाली.

मुख अतिथी माननीय रेश्मा कारखानीस, अध्यक्ष भाग्यश्री पाटील विद्यालयाचे सचिव आनंदजी लाहोटी प्राचार्य कर्नल श्रीनिवास कुलपती प्रवीणजी शिवणगीकर यांच्या हस्ते श्री सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. सर्वप्रथम विद्यालयाचे सचिव आनंदजी लाहोटी विद्यालयाचे प्राचार्य कर्नल श्रीनिवास यांनी सर्व महिला शिक्षक कार्यालयीन कर्मचारी व सेविका भगिनींना महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी सामाजिक शास्त्र विषयाचे शिक्षक विलास गायकवाड यांनी महिला दिनाचा मुख्य उद्देश आणि प्रगतीचा इतिहास आपल्या माहितीपूर्ण विचारातून मांडला. मराठी विषय शिक्षिका देवयानी कुलकर्णी यांनी मातृत्व ते नेतृत्व असा महिलांचा जीवन प्रवास आपल्या भाषणातून मांडला. महिलांना घराबाहेर पडण्याची मुभा नसतानाही स्वातंत्र्यपूर्व काळात मुलींसाठी स्वतंत्र अशीगोदावरी देवी लाहोटी कन्या विद्यालयाची स्थापना करण्याचा अभिनव निर्णय घेणारे श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थाचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय शेठ पुरणमलजीलाहोटी यांची दूरदृष्टी महिलांचे सशक्तिकरण करणारी ठरली असे विचार प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलू आपल्या भाषणातून मांडले. याप्रसंगी शिक्षिका भगिनींसाठी अनेक मनोरंजक खेळांचेविविध गुणदर्शन कार्यक्रमाचे आयोजन संदीप केंद्रे व सोमनाथ तांदळे यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कौस्तुभ जोशी यांनी केली तर आभार प्रदर्शन मंजुषा पाटील यांनी केले.

# जागतिक महिला दिन महापारेषणमध्ये उत्साहात साजरा

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये (महापारेषण) जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार उपस्थित होते.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक, महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर, अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने, महानिर्मितीचे मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. आनंद कोंत उपस्थित होते.



यावेळी बोलताना डॉ. संजीव कुमार म्हणाले, महिलांनी विविध क्षेत्रात आपले स्थान बळकट केले आहे. तसेच विकसित देशासाठी महिलांना प्रोत्साहन, आत्मविश्वास आणि ताकद देणे महत्त्वाचे आहे. आरोग्य क्षेत्राबरोबरच वीजक्षेत्रातही महिला आदर्श काम करीत आहेत. त्यांच्या कामांना पाठबळ देणे महत्त्वाचे आहे. यावेळी त्यांनी जागतिक महिला दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देऊन श्री. विश्वास पाठक म्हणाले, १९०५ मध्ये अमेरिकेत जागतिक महिला दिन सुरु झाला. २१ जून हा योगदिन म्हणून भारताने सुरु केला. आता सर्वच क्षेत्रात महिलांचा पुढाकार आहे, हे कौतुकास्पद आहे. अहिल्यादेवी होळकर, झाशीची राणी यांनी इंग्रज, मुघलांसोबत लढाई केली. तसेच संस्कृतीसाठी मोठा लढा उभारला. संस्कारक्षम कुटुंब, समाज आणि देश उभारणीमध्ये महिलांचा मोठा वाटा आहे. श्रीमती सुचिता भिकाने म्हणाल्या, महिलांनी वार्षिक आरोग्य तपासणी करणे गरजेचे आहे. आयुष्य जगताना महिलांनी महापारेषणचे नाव उंचावले आहे. मानव संसाधन, तांत्रिक आणि टीबीसीबी विभागाचे काम उल्लेखनीय आहे. चेहऱ्यावर कायम आनंदीपणा ठेवा. तसेच शारीरिक व मानसिक आरोग्य जपले पाहिजे. त्याचबरोबर आध्यात्मिक ऊर्जाही महत्त्वाची आहे. खडतर आयुष्यही मजबुतपणे जगले पाहिजे. आरोग्य व

### पद्मश्री अनुराधा पौडवाल, डॉ. निलेश व डॉ. गौरी साबळे यांच्याशी संवाद

सृष्टीतील सुसंवाद वाढविला पाहिजे. जमिनीचा पोत सुधारण्यासाठी वृक्षलागवड महत्त्वाची आहे. गोमूत्र, गोबर आणि गोमाता जगली तर सेंद्रीय आहाराबरोबरच जीवन सुकर होईल. याप्रसंगी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर आणि महानिर्मितीच्या मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुलकर्णी यांनीही महिलांना आत्मविश्वास वाढविण्यासाठी त्यांना सक्षम करणे गरजेचे आहे. महिलांना वेगवेगळ्या भूमिका पार पाडाव्या लागतात. त्यांच्यामध्ये सहनशीलता असल्यामुळे त्या अधिक सकारात्मकपणे काम करू शकतात, असे सांगितले.

यामध्ये प्रसिध्द पार्श्वगायिका पद्मश्री श्रीमती अनुराधा पौडवाल यांच्याशी निवेदिका स्मिता गवाणकर यांनी तर चला हवा येऊ द्या फेम डॉ. निलेश साबळे व डॉ. गौरी साबळे यांच्याशी निवेदक श्री. प्रशांत अनासपुरे यांनी संवाद साधला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील यांनी केले. सूत्रसंचालन श्रीमती कविता महाजन आणि श्रीमती रिता सुकलकर यांनी केले. महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू गायकवाड यांनी आभार मानले.

**स्वदेशी उत्पादनांची मोठी विक्री**

याप्रसंगी महिलांनी बनविलेल्या व विक्रीस ठेवलेल्या स्वदेशी उत्पादनांची विक्री मोठ्या प्रमाणात झाली. महिलांना सक्षम करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांनी पुढाकार घेतला आहे. यामध्ये घरगुती पदार्थ, डाळी, विविध उत्पादने विक्रीस ठेवण्यात आली होती.

## दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद एज्युकेशन सोसायटीच्या दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूर येथे दिनांक ९ मार्च रोजी जागतिक महिला दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावर्षीच्या कार्यक्रमाचा मुख्य विषय ''महिलांच्या मेंदूचे आरोग्य'' हा होता. महिलांच्या मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे तसेच निरोगी जीवनशैलीचे महत्त्व पटवून देणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.



या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. संगीता कदम (एम.एस.,न्यूरोसर्जन) उपस्थित होत्या. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. कदम यांनी महिलांच्या मेंदूच्या आरोग्याचे महत्त्व अधोरेखित केले. ताणतणाव, कामाचा ताण, कुटुंबातील जबाबदाऱ्या आणि आधुनिक जीवनशैली यांचा मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. तसेच नियमित व्यायाम, संतुलित आहार, सकारात्मक विचार आणि पुरेशी झोप या गोष्टी मेंदूच्या आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थिनींनी महिलांच्या सशक्तीकरणावर आधारित कविता व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांमध्ये उत्साह निर्माण केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. फार्म तृतीय वर्षातील विद्यार्थिनी कु. निकिता काळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. सुषमा पांचाळ यांनी केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील महिला प्राध्यापक प्रा. सुषमा पांचाळ, प्रा. सुप्रिया माळी, प्रा. श्रुती अंबड, प्रा. कांचन वाघमारे, प्रा. मुस्कान पठाण, तसेच इतर महिला शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## व्ही.पी. एज्युकेशनल कॅम्पसमध्ये फार्मसी शिक्षकांसाठी फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम संपन्न

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- व्ही. व्ही. पी. एज्युकेशनल कॅम्पस, छत्रपती संभाजीनगर रोड, धाराशिव येथे भैरवनाथ निसर्ग मंडळ संचलित कॉलेज ऑफ डी. फार्मसी मध्ये सर्व विभागातील शिक्षकांसाठी एक दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी डॉ. सुबोध कांबळे हे रिसोर्स पर्सन म्हणून उपस्थित होते. त्यांनी MSBTE CIAAN Norms Various Formats for Academic Monitoring या विषयावर उपस्थित शिक्षकांना सखोल मार्गदर्शन केले. शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध शैक्षणिक निकषांबाबत तसेच शैक्षणिक व्यवस्थापनातील बदलांविषयी त्यांनी माहिती दिली.

यावेळी त्यांनी संशोधनाचे महत्त्व अधोरेखित करताना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. तसेच NBA मानांकनासाठी आवश्यक असलेल्या गरजा, CIAAN 2023 मधील बदल आणि बाह्य शैक्षणिक निरीक्षण प्रक्रियेतील सुधारणा याबाबतही त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. अभियांत्रिकी व फार्मसी विभागातील शिक्षकांना शैक्षणिक अहवाल, विविध शैक्षणिक स्वरूप (Formats) आणि अकॅडमिक मॉनिटरिंग प्रक्रियेविषयी माहिती देण्यात आली.याशिवाय संस्थांमध्ये वापरल्या जाणाऱ्या ऑनलाईन इन्स्टिट्यूट सॉफ्टवेअरमध्ये झालेल्या नव्या बदलांबाबत देखील उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले.

या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राममध्ये ५० पेक्षा अधिक शिक्षकांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमादरम्यान विविध शैक्षणिक विषयांवर चर्चा करण्यात आली तसेच शिक्षकांनी आपले अनुभव एकमेकांशी शेअर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फार्मसी कॉलेजच्या प्रा.स्नेहल माने यांनी केले.

यावेळी शारदा देवी पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य अमरसिंह कवडे, कृषी महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रा. हरी घाडगे, आर.पी. कॉलेजचे प्रा.माने भैरवनाथ निसर्ग मंडळ कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरज ननवरे तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फार्मसी कॉलेजच्या प्रा.स्नेहल माने यांनी केले तर आभार प्रा, पवार यांनी मानले.

# जुन्या टायरच्या आगीचा भडका, पंक्चर काढण्यास उभारलेली पिकअप खाक



परंडा(प्रतिनिधी)-पंक्चर दुकानाच्या बाजूला पडलेल्या जुन्या टायरना लागलेल्या आगीमुळे बाजूलाच पंक्चर काढण्यासाठी थांबलेल्या पिकअपला आग लागली. अग्निशमन यंत्रणा वेळेत न पोहोचली नाही. काही जणांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र पिकअप पूर्ण जळून खाक झाला. परंडा तालुक्यातील अनाळा टायर पंक्चर दुकानासमोर ही घटना सोमवारी (दि.९) दुपारी घडली.


अनाळा येथे अनाळा-आंबी मार्गावर एक टायर पंक्चर काढण्याचे दुकान आहे. सदरील दुकानासमोर जुन्या टायरचा मोठा खच पडला होता. सदरील टायरच्या ढिगाऱ्यालगत पंक्चर काढण्यासाठी पिकअप उभे केले होते. अचानक दुपारी बाराच्या सुमारास टायरला आग लागली. बघता बघता आग भडकली. यामध्ये पिकअप (आरजे १४ जीटी २०७०) गाडीने पेट घेतला. ही गाडी आगीत भस्मसात झाली. ग्रामस्थांनी आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले आग लागल्यानंतर उशिराने का होईना भैरवनाथ सहकारी कारखान्यावरील अग्निशमन दलाच्या गाडीला पाचारण केले. आग विझवण्यासाठी मदत झाली. मात्र तोपर्यंत पिकअप आगीत जळून खाक झाले होते. सुमारे आठ-दहा किलोमीटरवरून आग दिसत होती. धुराचे लोट अवकाशात उडाले होते.

आग इतकी भिषण की रस्त्याकडेला उभ्या पिकअपला आग लागली असली तरी आगीच्या ज्वाला अन् धुरामुळे रस्त्यावरून वाहनाला जाता येत नव्हते. सुमारे एक तासभर वाहतूक ठप्प होती. या भिषण आगीत पिकअप जळाली. कोणतीही जीवितहानी नाही. घटनास्थळाची आंबी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस फौजदार होडशीळ यांनी पाहणी केली.

# उच्च शिक्षण उच्च विचारांचा सागर कुटुंब, एम के सागर त्यांचे वटवृक्ष....

## ८६ वा अभिष्टचिंतन सोहळा थाटात संपन्न





मुरूम (डॉ. रामलिंग पुराणे)- येथील भीम नगर येथील एम के सागर यांचे ८६ वा अभिष्टचिंतन सोहळा दि. ०९ वार सोमवार रोजी मुरूम नगरीचे नगराध्यक्ष बापुराव पाटील यांच्या उपस्थितीत थाटात संपन्न झाला. ०९ मार्च १९४० रोजीचा जन्म... उच्च शिक्षण घेऊन शिक्षण सेवेत स्वतःला झोकून दिले आणि पत्नी सौ. कस्तुराबाई सागर यांच्या सोबत संसाराचा गाडा हाकत सामाजिक, शैक्षणिक पाया रचत ३ मुले आणि ४ मुलींना उच्च शिक्षण दिले आणि तिन्ही मुले उच्च पदावर भरारी घेतली. राजस्थानचे सद्याचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचे सचिव राजकुमार सागर, ऍक्सीस बँकेचे शाखा व्यवस्थापक संजय सागर, पोलीस उपायुक्त, मुंबई विजयकांत सागर हे त्यांचे तीन मुले. वडिलांचा आदर्श,प्रेरणा डोळ्यासमोर ठेऊन शिक्षणाचा वटवृक्ष कायम जोपासण्यासाठी प्रयत्नशील राहिले. सागर यांनी डॉ. आंबेडकर शहर वाचनालयाचे अध्यक्ष म्हणून काम करत असताना वाचनालयच्या प्रगतीसाठी भरीव कार्य केले तसेच समाजातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. सामाजिक कार्यात ते उत्स्फूर्तपणे सहभाग असायचा. दि.०९ मार्च म्हणजेच त्यांचा जन्म दिवस आज रोजी ८६ वा अभिष्टचिंतन सोहळा मुरूम येथील भीमनगर येथे थाटात संपन्न झाला. यावेळी मुरूम नगरीचे नगराध्यक्ष सत्कारमूर्ती बापुराव पाटील, उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण, माजी नगराध्यक्ष धनराज मंगरूळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी पाटील यांच्या शुभहस्ते एम के सागर यांना शाल, पुस्पहार घालून सन्मान करण्यात आला. सागर कुटुंबाच्या वतीने उपस्थित मान्यवर, नगरसेवक गणेश अंबर,रुपचंद गायकवाड, श्रीराम कुलकर्णी, सचिन फनेपुरे, अमर भोसगे,अजित चौधरी,सौ. रागिणी गायकवाड आदिसह नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला.जेष्ठ सुपुत्र राजकुमार सागर, सुनबाई वदंनाताई सागर यांच्या शुभहस्ते औक्षण करून केक कापून अजिंक्य मुरूमकर यांनी आशीर्वाद गाथा गायन करून अभिष्टचिंतन सोहळा थाटात संपन्न झाले.याप्रसंगी पुत्र, सुनेचा आई -वडीलाप्रति घनिष्ठ प्रेम पाहून माता कस्तुरबाई भावुक झाल्या होत्या, त्यांच्या जीवनाचा सार्थ झाला जणू असे संदेश त्यांच्या भावनेतून व्यक्त होत होत्या. प्रास्ताविकपर बोलताना प्रा. अण्णाराव कांबळे यांनी एम के सागर यांच्या जीवन प्रवासावर प्रकाश टाकून, माजी मंत्री बसवराज पाटील यांनी दिलेल्या शुभेच्छा संदेशाचा वाचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश कांबळे आभार राजकुमार सागर यांनी मानले मदनलाल गायकवाड,राहुल गायकवाड,भारत गायकवाड,दिनेश भालेराव,सिद्धार्थ कांबळे,निखिल गायकवाड,अजित कांबळे,राजेश गायकवाड,शिवपुत्र शेटे, प्रजित कांबळे आदींनी सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. मुरूम शहर, भीम नगर येथील नागरिक, महिला भगिनी, विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.स्नेह भोजनाने सोहळ्याची सांगता संपन्न झाली.

अनुसूचित जाती निवासी शाळेत राजकुमार सागर यांच्या हस्ते सप्तनिक वृक्षारोपण, फळ वाटप

एम के सागर यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे औचित्य साधून राजकुमार सागर, पत्नी वदंना सागर यांच्या शुभहस्ते राजीव गांधी नगर येथील अनुसूचित जाती निवासी शाळा प्रांगणात विविध फळांचे झाडांचा वृक्षारोपण करण्यात आले. येथील मुलांना फळांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी शाळेच्या वतीने येतोचित स्तकार करून भारतीय संविधान भेट देण्यात आले. यावेळी मुख्यध्यापक श्रीकांत गाढवे, गृहपाल दत्तात्र्य कुंभार, शिक्षिका मृनाली करजकर, सह शिक्षक हरी गायकवाड, अंबाई सर्व्हिसेचे अभय भालेराव आदिसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.


# लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502
9175325708


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


# महाराष्ट्र शासन
# जलसंपदा विभाग

## अधिक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ नांदेड अंतर्गत
## कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, धाराशिव

## निविदा कार्यप्रणाली अंतर्गत
## निविदा सुचना क्र. २४ सन २०२५-२६

कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, धाराशिव अंतर्गत निविदा प्रणालीद्वारे (ऑफलाईन) ब-१ निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य तो अनुभव असलेल्या कंत्राटदार यांच्याकडुन ''ब-१'' नमुन्यातील निविदा मागवित आहेत.

निविदे बाबतचा संपुर्ण जाहिरात तपशील महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ https://wrd.maharashtra.gov.in यावर दिसेल तसेच दिनांक १६/०३/२०२६ ते २३/०३/२०२६ या कालावधीत ऑफलाईन निविदा खरेदी करु शकतात.

टिप : (सदर निविदा सुचने मध्ये रु. ७.९८ लक्ष किंमतीचे मनुष्यबळ पुरवठा बाबतची एक काम आहेत.)

स्वाक्षरीत/-

(यु. ई. पेरमपल्ली)
कार्यकारी अभियंता,
यांत्रिकी विभाग,
धाराशिव

जा.क्र./यांविधा/लेखा-४/नि.शा./४६४/२०२६
दिनांक :-०४-०३-२०२६

जिमाका/एके/जाहि -१६९


## तुळजाभवानी मातेवर रंगांची उधळण: मंदिराचे महंत, पुजारी अन् भाविकांचा मोठ्या संख्येने सहभाग



तुळजापूर (प्रतिनिधी)- तुळजाभवानी मंदिरात रविवारीनैसर्गिक कोरडा रंग खेळूनरंगपंचमी उत्सव साजरा करण्यातआला. या वेळी तुळजाभवानीमातेच्या मूर्तीवर रंगाची मुक्तउधळण करण्यात आली.महंतासह पुजाऱ्यांनी या उत्सवातसहभाग घेतला. सकाळच्याअभिषेक पुजेनंतर तुळजाभवानीमातेला महावस्त्र अलंकारघालण्यात येऊन धुपारती करण्यात आली. धुपारतीनंतर रंगपंचमीनिमित्त तुळजाभवानी मातेच्यामूर्तीवर रंगांची उधळण करण्यात आली.

दरम्यान सकाळच्या अभिषेकपूजेनंतर रंगपंचमी निमित्ततुळजाभवानी मातेला पांढरा शुभ्रशालू नेसवण्यात आला होता.पांढऱ्या शुभ्र शालूवर सप्त रंगाचीमुक्त उधळण करण्यात आली.सप्तरंगात न्हालेल्या तुळजाभवानीमातेचे रंगपंचमी दिवशी दिवसभरहजारो भाविकांनी दर्शन घेतले.याप्रसंगी महंत वाकोजीबुवा, महंतहमरोजीबुवा, धार्मिक व्यवस्थापकअमोल भोसले यांच्यासहपुजाऱ्यांची उपस्थिती होती. तत्पूर्वीरंगपंचमीसाठी महंताच्या मठातूनमोठ्या ताटात कोरडे रंग आणून रंगपंचमी उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी तुळजापूरसह परिसरातील भाविक मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

**परंपरेनुसार होतात उत्सव**

तुळजाभवानी मंदिरात गुढीपाडवा,रंगपंचमी, रथसप्तमी, दसरा-दीपावली, गणेशोत्सव, बैल पोळा या सणांसहस्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, शिवजयंती आदी राष्ट्रीय सण परंपरागतपद्धतीने साजरे होतात . या दिवशी देवीला अलंकार घातले जातात.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649